cmyk

## संपादकीय

### वस्तू-सेवा कर पुनर्रचना स्वागतार्ह

केंद्र सरकारने वस्तू-सेवा कर प्रणालीची पुनर्रचना करण्यावर विचार चालविला आहे. सध्याची पाच स्तरीय रचना प्रामुख्याने दोन स्तरांची करण्याची ही योजना आहे. त्यामुळे अनेक ग्राहकोपयोगी आणि गृहोपयोगी वस्तूंवरील कर कमी होऊन त्यांचे दर कमी होतील, अशी शक्यता आहे. केंद्र सरकारचा हा विचार सध्याच्या स्थितीत स्वागतार्ह आहे. मागणीमध्ये वाढ झाल्यास अर्थव्यवस्था अधिक गतीमान होते, ही अर्थशास्त्रीय वस्तुस्थिती आहे. वस्तूंचे दर कमी झाल्यास त्यांची खरेदी वाढते. त्यामुळे अशा वस्तूंचे उत्पादनही वाढते आणि अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी ही स्थिती लाभदायक असते.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-११८ | शनिवार, दि.२३ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


### जीएसटी सुधारणेसाठी मंत्रिगटाची मान्यता

नवी दिल्लः केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) रचनेत सुधारणा करण्यासाठी पाऊल उचलले आहे. जीएसटी संदर्भातील मंत्रिगटाने जीएसटीच्या ५ टक्के आणि १८ टक्के या दोन स्लॅबसाठी मान्यता दिली आहे. यामध्ये सिगारेट, तंबाखूवर ४० टक्क्यांहून अधिक कर आकारण्यास संमती देण्यात आली आहे. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर जीएसटीमध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित जीएसटी परिषदेत याबद्दल अंतिम निर्णय होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# योग्य कर्जमाफीचा योग्यवेळी योग्य निर्णय घेऊ

**पुणे । प्रतिनिधी**

**योग्य शेतकरी कर्जमाफीचा योग्यवेळी योग्य निर्णय घेऊ, असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी शुक्रवार दि. २२ ऑगस्ट रोजी शेतकरी कर्जमाफीवर विचारण्यात आलेल्या प्रश्नावर प्रसारमाध्यमांना उत्तर दिले. सध्या राज्यातील शेतकरी अडचणीत असून आधीच कर्जाचे ओझे, त्यात मुसळधार पावसामुळे पिकाचे झालेले नुकसान या दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे.योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय घेऊ असे अजित पवार म्हणाले.**



सध्या अतिवृष्टी शेती पिकाचे नुकसान या त्रासात असलेल्या बळीराजाला मदतीची गरज आहे. अशावेळी शेतक-यांना आशा आहे ती, कर्जमाफीची. मागच्या काही दिवसांपासून शेतकरी कर्जमाफी कधी होणार? असा प्रश्न सातत्याने विचारला जातोय. माजी आमदार बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीची मागणी लावून धरली आहे. त्यासाठी त्यांनी आंदोलन सुद्धा केली. आज राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांना शेतकरी कर्जमाफीबद्दल विचारण्यात आले. त्यावर त्यांनी उत्तर दिले.आता लाडकी बहिण आणि वीज माफीवर काम सुरु आहे. कर्जमाफी आमच्या जाहीरनाम्यात होती. योग्य वेळ आल्यावर कर्जमाफीचा निर्णय घेऊ असे अजित पवार म्हणाले. योग्यवेळ कधी येणार? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला, त्यावर योग्यवेळ आल्यावर ते आम्ही सांगू ना असे उत्तर अजित पवारांनी दिले. आमच्या जाहीरनाम्यात होते. एकंदरीत राज्यकारभार करताना सर्व गोष्टींचा विचार करुन पुढे पावले उचलावी लागतात. आमच्या ▶▶ पान २ वर

> **योग्य वेळ कधी येणार**
>
> राज्यात अतिवृष्टीने शेतातील उभी पिके गेली शेतकरी मेटाकुटीला आला आहे यात विरोधीपक्ष आणि शेतकरी संघटना कर्जमाफी सह सरसकट मदतीची मागणी करत आहेत यात सत्ताधारी यावर बोलत नाहीत केवळ नुकसान झाल्याची कबुली देत असले तरी निर्णय घ्यायला योग्य वेळ कधी येणार असा सवाल देखील विरोधी पक्ष करत आहे.

## थोडक्यात...

### गणेशोत्सवानिमित्त रेल्वेच्या ३८० विषेश फेऱ्या

नवी दिल्लीः भारतीय रेल्वेने यावर्षीच्या गणेश उत्सवाच्या काळात भाविकांसाठी आणि प्रवाशांसाठी सुसह्य आणि आरामदायी प्रवास सुनिश्चित करण्यासाठी ३८० गणपती विशेष रेल्वे फेऱ्या चालवण्यात येत आहे. महाराष्ट्र आणि कोकण प्रदेशातील प्रवासांची मोठी मागणी लक्षात घेऊन मध्य रेल्वेच्या २९६, पश्चिम रेल्वेच्या ५६, कोंकण रेल्वेच्या ६ तर दक्षिण रेल्वेच्या २२ फेऱ्या चालवल्या जाणार आहेत. गणेशोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान साजरा होणार असून, ११ ऑगस्टपासून गणपती विशेष रेल्वे सेवा सुरू झाल्या आहेत. या विशेष रेल्वे सेवांचा विस्तार कोकण रेल्वे, मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे मार्गांवर झाला आहे. या विशेष रेल्वेगाड्यांचे थांबे वाढविले आहेत.

### ताडोबातील आठ वाघिणींचे स्थलांतर होणार

चंद्रपूर : ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातून यापूर्वी पाच वाघिणीला ओडिसा आणि महाराष्ट्रातील नवेगाव व्याघ्र प्रकल्पात स्थलांतरित केले होते. आता पुन्हा आठ वाघिणींना स्थलांतरित करणार असल्याची माहिती आहे. वाघांच्या वाढत्या संख्येमुळे अधिवास क्षेत्र कमी पडत आहे. यातून मानव-वन्यजीव संघर्ष वाढले तसेच मागील चार वर्षात वाघांच्या झुंजीत आठ वाघांचा मृत्यू झाला. काही वाघ गंभीर जखमी झाले. दोन वाघांच्या झुंजीत कोर क्षेत्रातील दोन तर बफर क्षेत्रातील सहा वाघांचा मृत्यू झाला. हे टाळण्यासाठी व वाघांच्या सुरक्षित अधिवासासाठी स्थानांतरित करणे हाच उपाय आहे. मागील दोन वर्षांत ताडोबातील पाच वाघिणींना स्थानांतरित करण्यात आले.

### शेतकरी मेल्याचे सरकारला सोयर सुतक नाही-सपकाळ

मुंबईः राज्यात दररोज ६ शेतकरी आत्महत्या करत आहेत. परंतु भाजपा युती सरकारला त्याचे काहीच सोयर सुतक नाही. राज्यातले सरकार फक्त गेंड्याच्या कातडीसारखे निगरगट्टच नाही तर आंधळे, मुके व बहिरे आहे. या सरकारला भ्रष्टाचारापुढे शेतकऱ्यांचे दुःख दिसत नाही. भाजपा युतीचे सरकार हे शेतकरीविरोधी आहे. अदानी, अंबानीच्या फाईलवर सह्या करणाऱ्या देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या हाताला शेतकरी कर्जमाफीच्या फाईलवर सही करण्यास लकवा मारतो काय? असा संतप्त सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे.

## होमगार्ड तरुणीच्या हत्येला वेगळे वळण लव्ह ट्रँगलमधून झाला अयोध्याचा घात

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात एक भयंकर घटना घडली आहे. होमगार्ड तरुणीच्या हत्या प्रकरणात धक्कादायक माहिती उघड झाली असून प्रेमाच्या त्रिकोणातून दुसऱ्या तरुणीनेच सदर होमगार्डचा खून केल्याची माहिती समोर आली आहे. प्रियकर तरुणावरून झालेल्या भांडणात होमगार्ड तरुणीचा खून करण्यात आल्याचं पोलीस तपासात स्पष्ट झालं आहे. तिचा मृतदेह नाल्यात फेकून देण्यात आला होता. पोलिसांनी या प्रकरणी चार जणांना अटक केली आहे. ही धक्कादायक माहिती गुरुवारी सकाळी उघडकीस आली.**



मृत विवाहित तरुणीचे नाव अयोध्या राहुल व्हरकटे (वय २६) आहे. अयोध्या लुखामसला, ता. गेवराई येथे राहत होती. चार वर्षांपूर्वी तिचे पती अपघातात वारले. त्यामुळे अयोध्या ही तिच्या तीन वर्षांच्या मुलीसोबत राहत होती. अयोध्या नुकतीच होमगार्डमध्ये भरती झाली होती. अयोध्याची मैत्रीण फडताडे हिचे एका राठोड नावाच्या मुलावर प्रेम होते. पण काही दिवसांपासून राठोड आणि अयोध्याची जवळीक वाढली. त्यामुळे फडताडेला राग आला आणि याच रागातून तिने अयोध्याला मारण्याचा प्लॅन बनवला. दोन दिवसांपूर्वी फडताडे हिने अयोध्याला घरी बोलावले. तिथे मुलाच्या मदतीने तिने अयोध्याचा ▶▶ पान २ वर

## सरकारी वकिलाची आत्महत्या प्रकरणी न्यायाधीशासह लिपिकावर गुन्हा दाखल

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी न्यायालयातील सरकारी वकील विनायक लिंबाजी चंदेल (वय ४७, रा. इंदेवाडी, जि. परभणी) यांनी २० ऑगस्ट रोजी वडवणी न्यायालयातच गळफास घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणात दोन दिवसानंतर गुन्हा दाखल झाला आहे. न्यायाधीशावर गुन्हा दाखल होण्याची कदाचित राज्यातील ही पहिलीच घटना असावी.**

आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत त्यांनी एका न्यायाधीशावर आणि लिपीकावर मनमानी कारभार, वारंवार अपमान करून मानसिक छळाचा आरोप केल्याने हे प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. विनायक चंदेल



यांचा मुलगा विश्वजित चंदेल (१९) यांनी वडवणी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे वडील जानेवारी २०२५ मध्ये एमपीएससी परीक्षेद्वारे सरकारी वकील म्हणून वडवणी न्यायालयात रूजू झाले होते. जून २०२५ पासून वडवणी कोर्टातील नवनियुक्त न्यायाधीश रफीक शेख आणि लिपीक आण्णासाहेब तायडे हे त्यांना विनाकारण मानसिक त्रास देत होते. कामामध्ये अपमानित करणे, मनमानी काम करणे आणि त्यांचे म्हणणे न ऐकल्यामुळे ते सतत चिंताग्रस्त राहत होते. त्यातूनच त्यांनी आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलल्याचे विश्वजित याने म्हटले आहे. २० ऑगस्ट रोजी सकाळी चंदेल यांनी आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या खिशात चिठ्ठी सापडल्याची जोरदार चर्चा सुरू होती. परंतू त्यात न्यायाधिशांचे नाव असल्याने वडवणी पोलिसांकडून ही माहिती दडविण्यात आली होती. शिवाय विनायक यांचा ▶▶ पान २ वर

## पत्रकार ढेपेंना पोलिसाकडून अटकेची धमकी

धाराशिव। प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैद्य धंद्याविरूध्द आवाज उठवणाऱ्या पत्रकार सुनिल ढेपे यांच्यावर पोलिस निरीक्षक यांनी थेट पुणे येथे जावून अटक करण्याची धमकी दिली. या प्रकरणी ढेपे यांनी पोलिस अधीक्षक यांच्याकडे तक्रार केली आहे.

ढेपे हे धाराशिव जिल्ह्यातील पत्रकार आणि खंडोबा देवस्थानाचे पुजारी आहेत. प्रामुख्याने त्यांनी त्याच्या पोर्टलच्या माध्यमातुन धाराशिव जिल्ह्याम चाजणाऱ्या अवैद्य धंद्याविरोधात बातमी छापली होती. यापुर्वी देखील त्यांच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता त्यांत ते निर्दोष सुटले होते आता पोलिसांनी बातम्याचा राग मनात धरून ▶▶ पान २ वर

## विशेष पोलीस महानिरीक्षक मिश्रा यांनी घेतला जिल्ह्याचा आढावा

**बीड । प्रतिनिधी**

**आगामी काळातील गणेश उत्सव ईद अली उत्सवा संदर्भात जिल्ह्यातील शांतता सुव्यवस्था अबाधित राखण्या संदर्भात जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांची पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी आज आढावा बैठक घेतली या बैठकीमध्ये पोलीस अधिकाऱ्यांना काही सूचना केल्या त्यासोबतच यादरम्यान कुठेही अनुचित प्रकार घडू नये संशयित असलेल्या गुन्हेगारांना ताब्यात घेणे स्थानबद्ध करणे अधिकारवाया करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी केल्या.**



आज दिनांक २२/०८/२०२५ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी बीड जिल्हा ▶▶ पान २ वर

## गोदावरीत पाण्याचा विसर्ग वाढला राक्षसभुवन चे शनी मंदिर पाण्याखाली

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसापासून मराठवाड्यात आणि जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने पैठणच्या नाथसागरातील पाणी साठ्यामध्ये मोठी वाढ झाल्याने नाथसागराचे अठरा दरवाजे उघडले आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या गोदावरीला पाणी वाढले असून राक्षस भवन येथे असलेले शनी मंदिर देखील पाण्याखाली गेले आहे त्यामुळे शनि अमावस्येच्या दिवशी भाविकांना दर्शन घेता आले नाही.**

बीड जिल्ह्यासह राज्यात गेली चार ते पाच दिवसांमध्ये अतिवृष्टी झाली. जिल्ह्यातील पाऊस थांबला असला तरी पैठणच्या जायकवाडी धरणाच्या वरच्या भागात पावसाचा जोर कायम आहे. त्यामुळे जायकवाडी धरणात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने जायकवाडी धरणाचे १८दरवाजे ▶▶ पान २ वर

## विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टपूर्तीत महिलांचा सहभाग वाढवा-मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

**विकसित महाराष्ट्र २०४७ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. शक्ती संवादाच्या माध्यमातून महिला सुरक्षा आणि सक्षमीकरणाबाबत चर्चा आणि विचार मंथन होत असून, यावर सकारात्मक विचार करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे**



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय शक्ती संवाद कार्यक्रमाचे हॉटेल ट्रायडंट येथे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. या कार्यक्रमास विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना ▶▶ पान २ वर

## उपमुख्यमंत्री शिंदेंच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या जिल्हा समन्वयकावर हल्ला

**बीड । प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या जिल्हा समन्वयक विलास मस्के याच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात ते गंभीर जखमी असून खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. मध्यरात्री अज्ञात व्यक्तींनी घरात घुसून हल्ला केला.**

या मारहाणीत विलास मस्के गंभीर जखमी असून त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत आहे. धारधार शस्त्राने वार करत ही मारहाण करण्यात आली आहे. बीड जवळील पालवन येथे विलास मस्के यांचे घर आहे. मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात टोळक्यांनी घराचा दरवाजा ठोकून त्यांना बाहेर काढलं.याच वेळी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला आहे. विलास मस्के हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बीड मधील वैद्यकीय मदत कक्षात गेल्या तीन वर्षांपासून काम ▶▶ पान २ वर

## जिल्हा परिषदेच्या ६१ आणि पंचायत समितीच्या १२२ गट आणि गण रचना जाहीर

**बीड। प्रतिनिधी**

**बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी अखेर बीड जिल्हापरिषदेच्या ६१ गटांची आणि जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांमधील १२२ गणांसाठीची अंतिम रचना जाहीर केली आहे. यासाठी १४ जुलै रोजी प्रारूप प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यावरील आक्षेप आणि हरकतींवर सुनावणी झाल्यानंतर आता अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अंतिम प्रभाग रचनेत केज तालुक्यात मोठ्याप्रमाणावर बदल झाले आहेत.**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या संदर्भाने ग्रामविकास विभागाने बीड जिल्हा परिषदेसाठी ६१ इतकी सदस्यसंख्या निश्चित केली होती, त्यानुसार गट गण रचना करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यासाठीची प्रारूप प्रभाग रचना १४ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावर बीड जिल्ह्यातून मोठ्याप्रमाणावर हरकती घेण्यात आल्या होत्या. जिल्हापरिषद आणि पंचायत समितीसाठी दाखल करण्यात आलेल्या सुमारे ६६ हरकतींवर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५**


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

# पगारापेक्षा सरकारचा पेन्शनवरील खर्च जास्त!

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात पेन्शन आणि पगारावरील खर्चाबाबत एक आकडेवारी समोर आली आहे. बजेट प्रोफाइल कागदपत्रांनुसार, २०२३-२४ पासून पेन्शनवरील खर्च पगारापेक्षा जास्त झाला आहे. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातही हा ट्रेंड कायम राहण्याची अपेक्षा आहे. त्याचा परिणाम ८व्या वेतन आयोगावर दिसून येऊ शकतो. विशेषत: १ जानेवारी २०२६ पूर्वी निवृत्त झालेल्या सरकारी कर्मचा-यांच्या पेन्शनला फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.**



पगारापेक्षा पेन्शनवर खर्च जास्त : २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात पगारावर रु. १.६६ लाख कोटी आणि पेन्शनवर रु. २.७७ लाख कोटी खर्च करण्याचा अंदाज आहे. २०२२-२३ आणि २०२३-२४ दरम्यान 'पगार' खर्चात रु. १ लाख कोटींची मोठी घट झाली. ज्यावरून असे गृहीत धरता येते की, सरकारी कर्मचा-यांची संख्याही कमी झाली असेल. एकूण खर्च मात्र 'जैसे थे' : अर्थसंकल्पीय दस्तऐवजात 'पगार' आणि 'पेन्शन' खर्च आस्थापना खर्चात येतात. या दोन श्रेणींव्यतिरिक्त, आस्थापना खर्चात 'इतर' नावाचा एक वर्ग देखील समाविष्ट आहे. २०२२-२३ नंतर 'पगार' खर्चात मोठी घट झाली असली तरी, एकूण आस्थापना खर्चात सातत्याने वाढ झाली आहे. पगारांपेक्षा भत्त्यांसाठी जास्त वाटप : अर्थसंकल्पातील 'खर्च प्रोफाइल' भागात कर्मचा-यांना करावयाच्या देयकांची माहिती दिली आहे. हे तीन प्रमुख वर्गांमध्ये विभागले गेले आहेत: पगार, भत्ते (प्रवास खर्च वगळून) आणि प्रवास खर्च. २०१७-१८ पासून या खात्यातील एकूण वाटपात कोणतीही घट झालेली नाही. २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात 'पगार' खात्यातील वाटप ▶▶ पान २ वर

> **आठव्या वेतन आयोगावर परिणाम काय?**
>
> सरकार वेतन आयोग लागू करण्यासाठी जितका जास्त वेळ घेईल तितकेच मूळ वेतनाच्या तुलनेत महागाई भत्ता आणि इतर भत्त्यांचे प्रमाण वाढेल. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू झाल्यावर, अर्थसंकल्पातील 'पगार' आणि अर्थसंकल्पीय प्रोफाइलमधील 'पगार' या विभागात अचानक मोठी वाढ होईल.

## अखेर सोमनाथ सुर्यवंशी मृत्यूप्रकरणी एसआयटीची स्थापना

**परभणी । प्रतिनिधी**

**परभणीतील पोलीस कोठडीत मृत्यू पावलेले शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या चौकशी प्रकरणी अखेर एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्याच्या पोलीस महासंचालकांना ८ दिवसांत एसआयटी स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी एसआयटीची घोषणा केली आहे.**



या एसआयटीचे प्रमुख म्हणून सुधीर हिरेमठ, अभिजीत धाराशिवकर, अनिल गवाणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या तपास पथकात परभणी जिल्ह्यातील कोणत्याही अधिकारी वा कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात येणार नाही, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. एसआयटी चे प्रमुख हे प्रत्यक्ष अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे काम पाहणार आहेत.

cmyk

## अग्रलेख

# वस्तू-सेवा कर पुनर्रचना स्वागतार्ह

केंद्र सरकारने वस्तू-सेवा कर प्रणालीची पुनर्रचना करण्यावर विचार चालविला आहे. सध्याची पाच स्तरीय रचना प्रामुख्याने दोन स्तरांची करण्याची ही योजना आहे. त्यामुळे अनेक ग्राहकोपयोगी आणि गृहोपयोगी वस्तूंवरील कर कमी होऊन त्यांचे दर कमी होतील, अशी शक्यता आहे. केंद्र सरकारचा हा विचार सध्याच्या स्थितीत स्वागतार्ह आहे. मागणीमध्ये वाढ झाल्यास अर्थव्यवस्था अधिक गतीमान होते, ही अर्थशास्त्रीय वस्तुस्थिती आहे. वस्तूंचे दर कमी झाल्यास त्यांची खरेदी वाढते. त्यामुळे अशा वस्तूंचे उत्पादनही वाढते आणि अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी ही स्थिती लाभदायक असते. तसेच वस्तूंचा खप वाढल्यास प्रशासनाच्या उत्पन्नातही भर पडते. सध्या वस्तू-सेवा कराचे ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के, २८ टक्के आणि ४० टक्के असे पाच स्तर आहेत. सध्या सरकारला वस्तू-सेवा करातून जे उत्पन्न मिळते, त्यांच्यापैकी जवळपास ६५ टक्के उत्पन्न १८ टक्क्याच्या स्तरातील विक्रीतून मिळते. तर ५ टक्के स्तरातून ७ टक्के आणि १२ टक्के स्तरातून ५ टक्के आणि २८ टक्के स्तरातून ११ टक्के उत्पन्न मिळते. नव्या प्रस्थापित रचनेनुसार ज्या वस्तू किंवा सेवांवर १२ टक्के कर आहे, त्यांच्यातील बव्हंशी वस्तू आणि सेवा ५ टक्के कराच्या श्रेणीत आणल्या जाणार आहेत. तर काही वस्तू आणि सेवा १८ टक्के कराच्या श्रेणीत आणल्या जाणार आहेत. अशा प्रकारे १२ टक्के कराची श्रेणी बंद केली जाणार आहे. त्याचप्रमाणे सध्या ज्या वस्तू आणि सेवांवर २८ टक्के कर आहे त्यांच्यापैकी ९० टक्के वस्तू आणि सेवा आता १८ टक्क्यांच्या श्रेणीत आणण्याचा प्रस्ताव आहे.

या इतर काही वस्तू आणि सेवा सर्वात वरच्या, म्हणजे ४० टक्क्यांच्या करश्रेणीत नेण्याचा विचार आहे. याचा अर्थ असा की २८ टक्के ही करश्रेणीही जाणार आहे. त्यामुळे ५ टक्के आणि १८ टक्के या दोनच करश्रेणी प्रामुख्याने उरणार आहेत. ४० टक्क्याची करश्रेणी राहिली तरी तिच्यातील वस्तू आणि सेवा कमी प्रमाणात असतील. ज्यांना 'वाईट वस्तू' म्हणून संबोधले जाते (उदाहरणार्थ सिगरेटस, तंबाखूची उत्पादने, मद्य इत्यादी) त्यांच्यासाठी ४० टक्के कराची श्रेणी असेल. अशा प्रकारे एकंदर वस्तू-सेवा करप्रणाली सुलभ आणि ग्राहकस्नेही करण्याची ही योजना असल्याचे दिसून येते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरुन केलेल्या भाषणात या परिवर्तनाचे सुतोवाच केले आहे. यंदाच्या दिवाळीच्या आधी ही भेट भारतीयांना दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. याचाच अर्थ येत्या दीड महिन्यात यासंबंधीचा निर्णय होऊन नवी कररचना अस्तित्वात येईल, असे दिसते. साधारणत: असे निरीक्षण आहे, की सर्वसामान्य ग्राहकाच्या उपयोगाच्या वस्तू आणि सेवा सध्याच्या ५ टक्के, १२ टक्के १८ टक्के आणि २८ टक्के या करश्रेणीत येतात. नवा प्रस्ताव प्रत्यक्षात आल्यानंतर या वस्तू आणि सेवांची विभागणी ५ टक्के आणि १८ टक्के या करश्रेणींमध्ये केली जाईल. परिणामी, अनेक वस्तू आणि सेवा आतापेक्षा अधिक स्वस्त होण्याची शक्यता आहे. कोणत्या वस्तू आणि सेवा कोणत्या करश्रेणींमध्ये समाविष्ट केल्या जातात, यावर अर्थातच, त्यांचे दर अवलंबून असतील. सध्या अनेक जीवनावश्यक वस्तूंवर वस्तू-सेवा कर लागू करण्यात आलेलाच नाही. या वस्तू किंवा सेवांना शून्य कराच्या श्रेणीतच ठेवले जाईल. अशा प्रकारे बव्हंशी वस्तू-सेवांवरील कर कमी करुन त्यांचे दर कमी करण्याचा आणि त्यायोगे त्यांची मागणी वाढविण्याचा हा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. जीएसटी प्रणालीतील करांच्या स्तरांची संख्या कमी केली जावी आणि ही प्रणाली अधिक सोपी केली जावी, अशी मागणी अनेक महिन्यांपासून केली जात होती. ती आता लवकरच पूर्ण होईल असे वाटते. हे परिवर्तन करण्याच्या विचारामागे अनेक कारणे आहेत. भारताची अर्थव्यवस्था सध्या साधारणत: प्रतिवर्ष ६.२५ टक्के ते ६.५० टक्के या दराने वाढत आहे. तथापि, अमेरिकेने नव्याने स्वीकारलेल्या जाचक व्यापारशुल्क धोरणामुळे भारताच्या अमेरिकेला होणाऱ्या वस्तूंच्या निर्यातीवर ५० टक्के व्यापार शुल्क लागू करण्याची घोषणा त्या देशाने केली आहे. यापैकी २५ टक्के कर हा लागू झाला असून, काही तडजोड झाली नाही, तर ५० टक्के कर २८ ऑगस्टपासून लागू होणार आहे. याचा परिणाम अमेरिकेला भारताकडून होणाऱ्या निर्यातीवर होऊ शकतो. निर्यातीचे प्रमाण अनेक वस्तूंच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. त्यामुळे त्या वस्तूंचे उत्पादन करणारे कारखाने आणि तेथे काम करणाऱ्या कामगारांच्या नोकऱ्या यांच्यासमोर अस्तित्वाचे संकट उभे राहू शकते. तथापि, भारत ही स्वत:च एक मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे निर्यात होणाऱ्या वस्तूंपैकी काही वस्तू भारतातच खपल्यास निर्यातकपातीची झळ कमी होऊ शकते. त्यामुळे वस्तू-सेवा करप्रणालीची पुनर्रचना करण्याचा निर्णय त्वरेने घेण्यात आला असावा. दुसरे कारण अर्थातच, भारतात मागणीत वाढ व्हावी, हे आहे. सद्य:स्थितीत वस्तू-सेवा कर प्रणालीची पुनर्रचना हा विषय महत्त्वाचा ठरतो आणि केंद्र सरकार या संदर्भात जो निर्णय घेऊ इच्छिते तो स्वागतार्ह आहे, असे अनेक मान्यवर अर्थतज्ज्ञांचेही मत आहे.

## जालना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

जालना । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार जालना जिल्हा परिषदेच्या ५७ जागा आणि त्याअंतर्गत भोकरदन-२२, जाफ्राबाद-१२, बदनापूर-१०, जालना-१८, मंठा-१२, परतूर-१०, घनसावंगी-१४ व अंबड-१६ अशा एकूण जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या ११४ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे.

ही अधिसूचना जालना जिल्हाधिकारी कार्यालय, जालना जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## महाराष्ट्राचा पारंपरिक सण बैल पोळा तलवाडा पंचक्रोशीत शांततेत उत्साहात साजरा

तलवाडा । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात बैल पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला हा सण शेतकऱ्यांसाठी खूप खास असतो, कारण शेतीत वर्षभर मदत करणाऱ्या बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. पोळ्याच्या दिवशी शेतकरी बैलांना कामापासून आराम देतात आणि त्यांची पूजा करतात. सजावट आणि मिरवणूक सकाळपासूनच शेतकरी आपल्या बैलांना स्वच्छ अंघोळ घालून त्यांची शिंगे त्यांना आकर्षक रंगांच्या झुली, पितळी घुंगरू आणि मखमली वेषाने सजवले जाते.**



अनेक ठिकाणी, सजवलेल्या बैलांची ढोल-ताशांच्या गजरात गावातून मिरवणूक काढण्यात आली लहान मुले आणि मोठे नागरिक या मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते तलवाडा येथे बैल पोळ्याचा मान निलेश देशमुख कुटुंबायाना मिळाला आहे. तलवाडा येथील वेस मध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तोरण लावण्यात आले होते त्या तोरण तोडून बैलपोळा सुरुवात करण्याचा मान देशमुख कुटुंबांना मिळाला आहे. यावेळी गाजत वाजत बैलपोळा मिरवणूक काढण्यात आली पोळा पाहण्यासाठी गावातील मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते बैल पोळा शांततेत उत्साहात साजरा झाला. तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील प्रत्येक गावात बैल पोळा शांततेत उत्साहात साजरा करण्यात आला कोणत्याही गावात अनुचित प्रकार घडू नये यासाठी सपोनि मनोज निलंगेकर यांनी तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील गावांत बंदोबस्त तैनात करण्यात आला होता पोलिस स्टेशन हद्दीतील गावात बैल पोळा शांततेत उत्साहात साजरा झाला एकही गुन्हा दाखल झाला नाही असल्याची माहिती सपोनि मनोज निलंगेकर यांनी दिली आहे.

## चेक बाऊन्स प्रकरणात नोटीस देण्यासाठी मुदतवाढ द्यावी-अॅड.धन्नावत

जालना । प्रतिनिधी

दि.१ ऑगस्ट पासुन पोस्ट ऑफीस सॉफ्टवेअर अपडेट व रक्षाबंधन सणामुळे पोस्ट ऑफीस या कार्यालयाने टपाल स्वीकारले नसल्याने अनेक प्रकरणात ज्यामध्ये नोटीस मुदतीत देणे बंधनकारक होते त्या प्रकरणात नोटीस देता आली नाही, उदाः चेक बाऊण्स प्रकरणात धनादेश अनादरीत झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत नोटीस देणे बंधनकारक आहे. धनादेश अनादरीत झाल्यानंतर ज्या लोकांचे ३० दिवस हे १ ऑगस्ट ते १० ऑगस्ट दरम्यान आले, त्या लोकांना निगोशिएबल इस्ट्रमेंट अॅक्ट प्रमाणे नोटीस देता आली नाही म्हणुन अनेकांनी उशिराने नोटीस दिल्याने भविष्यात न्यायालयात प्रकरण दाखल करतांना अडचण येऊ नये म्हणुन मा. मुख्यमंत्री यांनी केंद्र शासनाकडे किंवा स्वतः परिपत्रक काढुन मुदत वाढ द्यावी यासाठी अँड. महेश सिताराम धन्नावत, कार्याध्यक्ष नोटरी असोसिएशन जालना यांनी जिल्हाधिकारी, जालना यांच्या मार्फत मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे. जर मुदतवाढ देण्यात आली, तर अनेक लोकांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा अँड. धन्नावत यांनी व्यक्त केली.

## बैल धुण्यासाठी गेलेल्या वृध्द सालगड्याचा पाण्यात बुडून मृत्यू

**तलवाडा प्रतिनिधी**

आज महाराष्ट्रात भरात परंपरिक नुसार बैलपोळा सण शेतकरी राजा मोठ्या आनंदात उत्साहात साजरा करतो वर्षभर राब राबणाऱ्या बैलाची खांदे मांडणी व संजावट करून बैलपोळा साजरा करण्यात येतो. तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील भेंडटाकळी येथील शेतकरी मोहन वैशिष्ट्? लोंढे यांच्याकडे सालाने ठेवलेल्या गडी बिभिषण सुदाम लोंढे वय वर्षे ५२ बैलाला पोळ्यानिमित्ताने दिं.२२ रोजी सकाळी आठच्या सुमारास भेंडटाकळी सिंचन तलाव ६० ते ७० एकरचा असलेल्या तलावात धुण्यासाठी नेले व ते बैलांना धुवून स्वच्छ करून तळ्या बाहेर आणून सोडले परंतु त्यानंतर स्वतः आंघोळीसाठी बिभिषण सुदाम लोंढे गेले त्यांच्यासोबत त्यांचे दोन नातू लहान लहान सोबत होते परंतु नातू मोबाईलच्या नादात बसलेले होते त्यानंतर आपले आजोबा का दिसत नाही त्यांनी आढावडा केला त्यानंतर गावातील ग्रामस्थ जमा झाले हा प्रकार समोर आला या पाणी जास्त असल्यामुळे व या सिंचन तलावाचा गाळ उपसा करण्यात आला होता दोन ते



तीन-तीन परस मोठें खड्डे असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर यांना गावकऱ्यांनी दिली तात्काळ घटनास्थळी कर्मचारी दाखल झाले होते त्यानंतर अग्निशामक दल बीड, गेवराई ,यांची टीम दाखल झाली होती सलंग सहा ते सात तास शोधा शोध मोहीम राबवली परंतु अखेर या व्यक्तीचा शोध लागला नाही या घटनेची माहिती मिळतात तहसीलदार खोमणे, तलाठी गावातील सरपंच व प्रतिष्ठित नागरिक यांनी मोठी गर्दी केली होती भेंडटाकळी गावात बैल पोळा सण गावकऱ्यांनी साजरा केला नाही भेंडटाकळी गावात दुःखाचा डोंगर कोसळला असल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

## स्वदेशीचा स्वीकार केल्यास शेतकरी, कामगार, लघुउद्योजक व्यापारी समृद्ध बनतील-सतीश पंच

जालना । प्रतिनिधी

**जालना व्यापारी महासंघाच्या पुढाकाराने हाती घेण्यात आलेल्या ''स्वदेशी वापरा देश वाचवा'' या व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन मोंढ्यातील होलसेल किराणा यार्डात मोठ्या उत्साहात करण्यात आला. या अभियानांतर्गत स्वदेशी वस्तूंच्या वापराबाबत जनजागृती पत्रकाचे वाटप करण्यात येत आहे.**



यावेळी पुरुषोत्तम अग्रवाल, किशन भक्कड, सुनील रुणवाल, राजेंद्र लोहिया, अनील पंच, संजय लव्हाडे, गौतम श्रीश्रीमाल, दत्ता लड्डा, कपिल चावला, वसिम कच्छी, अनील लोढा, प्रवीण कामड, यश जांगडा, संतोष डागा, मुन्ना गर्ग, श्री. नवपुते, आशिष सावजी, अमित अग्रवाल, विनोद गर्ग, रमेश अलीझार, विपुल गोसरानी, अशोक अग्रवाल, दिनेशकुमार नेमीचंद आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या अभियानाअंतर्गत ''स्वदेशी वस्तूंना प्राधान्य द्या आणि परकीय वस्तूंचा बहिष्कार करा''. 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान आणि जय व्यापार' हा संदेश देत देशहितासाठी स्थानिक उत्पादनांना चालना देण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. या वेळी बोलताना जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच म्हणाले की, हे जनजागृतीपर जिल्हाभर राबविण्यात येणार आहे. ग्रामीण व शहरी जनतेशी प्रत्यक्ष संवाद साधून जनजागृती केली जाणार आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात परदेशी वस्तूंनी आपला बाजार व्यापला आहे. ही वस्तुस्थिती बदलण्यासाठी आपण सगळ्यांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. 'मेक इन इंडिया' हे केवळ सरकारचे धोरण नाही, तर प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. स्वदेशी वस्तूंचा वापर केल्याने केवळ आपली अर्थव्यवस्था मजबूत होणार नाही, तर शेतकरी, कामगार, लघुउद्योजक आणि व्यापाऱ्यांनाही मोठा आधार मिळेल. आपण जर स्वदेशी स्वीकारले, तरच खरी देशभक्ती घडेल. म्हणूनच प्रत्येक नागरिकाने 'स्वदेशी अपनाओ देश बचाओ' हा संकल्प मनोमन स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. या अभियानामुळे जनसामान्यांमध्ये स्वदेशी उत्पादनांविषयी जागरूकता वाढेल आणि स्थानिक उद्योग-व्यापाराला बळ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## बीडसांगवीत तरूणाची आत्महत्या

**आष्टी । प्रतिनिधी**

**एका २३ वर्षीय तरुणाने गळफास घेत आत्महत्या केल्याची दुर्देवी घटना आष्टी तालुक्याच्या बीड सांगवीमध्ये शुक्रवारी पहाटे दि.२२ ऑगस्ट रोजी उघडकीस आली.आष्टी पोलिस ठाण्यात आकस्मिकमृत्यूची नोंद करण्यात आली.**

आष्टी अविनाश बापू दिवटे असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. बीड सांगवी येथे राहणाऱ्या अविनाश बापू दिवटे या २३ वर्षीय तरुणाने राहत्या घरी शुक्रवारी पहाटे गळफास घेऊन जिवन संपवले आहे.पडवीमध्ये दोरीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केल्याच्या अवस्थेत दिसून आला.या घटनेची माहिती मयताच्या नातेवाईकांनी आष्टी पोलिसांना देताच पोलीस निरीक्षक शरद भुतेकर ,पोलीस हवालदार गणेश जगताप, बब्रुवाण वाणी,पो.ह.विकास जाधव आदींनी घटनास्थळी दाखल होत घटनेचा पंचनामा केला. या घटनेची नोंद आष्टी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून मृत्यूचे कारण अद्याप कळू शकले नाही पुढील तपास पो.ह.विकास जाधव हे करत आहेत.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन

जालना । प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मुंबईत ''जगविख्यात, विद्रोही बहुजन साहित्यिक अण्णाभाऊ साठे'' या चंद्रकांत कारके लिखित चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रदेश सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे, शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रमजी काळे, संजयजी बोरगे, विठ्ठल बरकुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.**



या कार्यक्रम प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा चरित्र ग्रंथ नव्या पिढीला प्रेरणादायी ठरेल, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे केवळ थोर लेखक नव्हते तर ते समाज परिवर्तनाच्या लढ्यातील अग्रणी सैनिक होते. वंचित उपेक्षित, शोषीतांचे दुःख त्यांनी आपल्या लेखणीतून मांडले. बहुजन समाजाला स्वाभिमानाची दिशा त्यांनी दिली. अण्णाभाऊंच्या साहित्यातून केवळ विद्रोहच नव्हे तर संवेदना, संघर्ष आणि आशावादाची दिशा मिळते. पुढे अजित पवार म्हणाले की, लेखक चंद्रकांत कारके यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर आधारित लिहिलेल्या या पुस्तकात अण्णाभाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, साहित्यप्रवासाचा आणि सामाजिक कार्याचा मागोवा घेतलेला हा ग्रंथ नव्या पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरेल. यासाठी हा ग्रंथ प्रत्येकाने वाचला पाहिजे.

## पान १ वरून...

### योग्य कर्जमाफीचा योग्यवेळी

मुख्यमंत्र्यांना, उपमुख्यमंत्र्यांना मी सांगितले आहे. योग्यवेळ आल्यावर निर्णय घेऊ असे अजित पवार म्हणाले.आता योग्य वेळ कशी आणि कधी येणार याकडे बळीराजाचे डोळे लागले आहेत.

-------------

### सरकारी वकिलाची आत्महत्या प्रकरणी

मुलगा विश्वजीत यानेही पोलिसांवर गुरूवारी आरोप केला होता. या प्रकरणावर माध्यमांनी प्रकाश टाकल्यावर शुक्रवारी दुपारी ३:४७ वाजता गुन्हा दाखल झाला. नातेवाईकच तक्रार द्यायला येत नव्हता, असा खुलासा पोलिसांनी केला असला तरी विश्वजीत यांच्या आरोपामुळे त्यात किती तथ्य? याबाबत संशय व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे न्यायालय मध्येच सरकारी वकील आणि आत्महत्या केल्याची घटनाही राज्यातील पहिलीच त्यासोबतच न्यायाधीशावर देखील गुन्हा दाखल होण्याची ही पहिलीच घटना असावी. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलिस उप.निरीक्षक वर्षा व्हगाडे या करत आहेत.

---------

### होमगार्ड तरुणीच्या हत्येला वेगळे वळण

गळा दाबून खून केला. नंतर त्यांनी मृतदेह लपवण्याचा प्लॅन केला. फडताडेच्या मुलाने एका ओळखीच्या माणसाकडून स्कूटी घेतली आणि त्या स्कूटीवरून त्यांनी मृतदेह एका खोक्यात टाकला. नंतर हा मृतदेह बीड शहराजवळील नाल्यात फेकून देण्यात आला होता.गुरुवारी सकाळी काही लोकांना तो मृतदेह दिसला. स्थानिकांनी लगेच याबाबतची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला. पोलिसांनी तपास करत आरोपी फडताडे, तिचा मुलगा आणि इतर दोन जणांना अटक केली आहे.

--------------

### गोदावरीत पाण्याचा विसर्ग वाढला

उघडण्यात आले आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातून वाहणारी गोदावरी नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. गोदावरीला पाणी वाढल्याने साडेतीन पिठाचे शक्तीपीठ म्हणून ओळख असलेल्या राक्षसभुवन येथील शनी मंदिर पाण्याखाली गेले आहे.पैठण येथील नाथसागर (जायकवाडी) धरणात पाण्याची आवक वाढल्याने काल धरणाचे १८ दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे गोदावरी नदीला पाणी मोठ्या प्रमाणात वाढले असून गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन येथील शनी मंदिराला पाण्याचा वेढा पडला आहे. मंदिराच्या चारही बाजूंनी सर्वत्र पाणीच पाणी आले आहे. गोदावरी नदी दुधडी भरून वाहू लागली असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान शनी महाराज मंदिराला पाण्याचा वेढा पडल्यामुळे शनी महाराजांचे दर्शन बंद करण्यात आले आहे.

--------------

### विशेष पोलीस महानिरीक्षक मिश्रा

पोलीस दलाची आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्ह्यातील प्रत्येक विनाउघड गुन्ह्यांचा आढावा घेऊन सदर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी विशेष प्रयत्न करण्याच्या सुचना देण्यात आल्या. आगामी काळात साजरे होणारे ईद-ए-मिलाद, गणेशोत्सव सणांच्या अनुषंगाने मिरवणूक मार्ग, विसर्जन मार्गाचे प्रभारी अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून अडथळे असल्यास ते दुर करावे. सराईत गुन्हेगारांवर तात्काळ प्रतिबंधक कारवाई करावी. मागील वर्षी गणेशोत्सवात दाखल गुन्ह्यांची तात्काळ निर्गती करावी. आपल्या पोलीस स्टेशन हद्दीत डी.जे. ला अजिबात परवानगी देऊ नये. डी.जे. वाजविल्यास कायदेशीर कारवाई करावी. धार्मिक स्थळावरील ऑग्यांबाबत शासनाकडून आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कारवाई करावी. अशा सुचना श्री. वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, छ. संभाजीनगर परिक्षेत्र यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना दिल्या. तसेच आगामी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद च्या अनुषंगाने शांतता समितीची बैठक घेण्यात आली. तसेच जिल्ह्यातील पोलीस अधिकारी यांच्या अडचणी जाणून घेतल्या. जिल्ह्यातील आगामी सण उत्सव शांततेत, निर्विघ्न व उत्साहपूर्ण वातावरणात साजरे होतील यासाठी सर्व प्रभारी अधिकारी यांनी कटिबद्ध असायला हवे. तसेच डि.जे. मुक्त धोरण कायम राहीले पाहीजे. बदलत्या काळानुसार पोलीसांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर दैनंदिन कामकाजात केला पाहीजे'' असे प्रतिपादन वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, छ. संभाजीनगर परिक्षेत्र यांनी केले.

-----------

### जिल्हा परिषदेच्या ६१ आणि पंचायत

यांच्यासमोर सुनावणी झाली. या सुनावणीत केज तालुक्यातील काही हरकती स्वीकारण्यात आल्या. त्यानुसार आता नव्याने प्रभाग रचना करून अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. केस तालुक्यात पूर्वी जिल्हा परिषद गट होते आता आठ गट आणि १६ पंचायत समिती गण झाले असून युसुफ वडगाव भाटुंबा ढाकेफळ आणि सावळेश्वर ही गावे काही गट आणि गणांमध्ये बदलली गेली आहेत

--------------

### उपमुख्यमंत्री शिंदेंच्या वैद्यकीय मदत

पाहत आहेत. दरम्यान हल्लेखोरांना अटक करून कारवाई करावी अशी मागणी विलास मस्के यांच्या नातेवाईकांनी केली आहे.

-----------

### विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टपूर्तीत

साकोरे-बोर्डीकर, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, मनीषा चौधरी, विद्या ठाकूर, सदस्य सचिव नंदिनी आव्हाडे, सहसचिव राधिका चक्रवर्ती यांच्यासह विविध राज्यातील महिला आयोगाच्या अध्यक्षा, सहसचिव, सदस्य उपस्थित होते. यावेळी पॉश कायद्यासंदर्भातील पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. दोन दिवस शक्ती संवादाच्या माध्यमातून राज्यासह देशातील महिलांच्या विविध समस्या आणि त्यावर उपाय यासदंर्भात चिंतन मंथन होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नपूर्तीसाठी महिलांचा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत सहभाग आवश्यक असल्याचे म्हणाले.

-----------

### पगारापेक्षा सरकारचा पेन्शनवरील

कमी झाले आहे, कारण 'पगार' खात्यात आता महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी भत्ते समाविष्ट नाहीत, जे २०२३-२४ पासून 'भत्ते' (प्रवास खर्च वगळून) खात्यात समाविष्ट केले गेले आहेत. तात्पर्य, एकूण खर्च कमी झालेला नाही, परंतु वेगवेगळ्या श्रेणींमध्ये पुनर्वर्गीकृत करण्यात आला आहे.

-----

### पत्रकार ढेपेना पोलिसाकडून

त्यांना थेट आटकेची धमकी दिली आहे. तुळजापुर मध्ये ड्रग्ज प्रकरण गाजले होते त्याही बातमीचा राग धरून ढेपे यांना आरोपी करण्याचा प्रयत्न पोलिसाकडून होत असल्याची तक्रार ढेपे यांनी केली असून तसी तक्रार पोलिस अधीक्षक यांना पत्रकार सुनिल ढेपे यांनी दिली आहे.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. २३ ऑगस्ट २०२५




## थोडक्यात...



### आदित्य शिंदे यांचा सत्कार

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयातील २०२४ २५ मध्ये बीए अंतिम वर्षात उत्तीर्ण झालेला विद्यार्थी आदित्य अशोकराव शिंदे हा डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत नायब तहसीलदार या पदाची परीक्षा उत्तीर्ण झाला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रम सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ विश्वास कदम प्रभारी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य माननीय दीलीप राव जाधव सल्लागार समितीचे सदस्य माननीय बाबासाहेब जाधव पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती भोंडवे साहेब उपस्थित होते अत्यंत गरीब परिस्थिती शिक्षण घेऊन शिंदे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेला आहे महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रा चा विद्यार्थी आहे त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी त्यांचे अभिनंदन करून महाविद्यालयाच्या वतीने सत्कार कार्यक्रम संपन्न झाला.

### अध्यक्षपदी सुनील गायगवे तर उपाध्यक्षपदी इम्रान कुरेशी

माजलगांव । प्रतिनिधी

शहरातील नामअंकित गणेश मंडळापैकी माजलगावची शान क्रांतिवीर गणेश मंडळाची नुकतीच बैठक घेण्यात आली त्यात मोठ्या संख्येने मंडळाचे जेष्ठ तथा युवक उपस्थित होते सर्वांनीमते पुढील प्रमाणे मंडळाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली अध्यक्ष: सुनिल गायगवे,उपाध्यक्ष: इम्रान कुरेशी,सचिव :महादेव कोंबडे,कोषाध्यक्ष: अभिजीत कोंबडे लैझिम प्रमुख:- अमोल कोंबडे, सुमित साळवे,निलेश गरुड, परमेश्वर धारक सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख: शुभम मोगरेकर, विनोद शिंदे, निशिकांत पाटील,शुभम गरुड,राजेश कोंबडे,आरोग्य शिबीर प्रमुख:अमर रांजवण, महेश होके, राहुल बावणे, विक्रम शिंदे.गणेश मंडळाचे वैशिष्ट्ये म्हणजे माजलगांव शहर पोलिस स्टेशन वतीने गणेश उत्सव २०२३ गणराया आव्हाड योजना प्रथम क्रमांक क्रांतिवीर गणेश मंडळाचा आला होता २१ हजार रुपये पारितोषिक व सन्मान चिन्ह भेटले होते पोलीस स्टेशन,आमदार चषक अशा अनेक पुरस्काराने सन्मानित तसेच सामाजिक कार्यात मंडळांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आरोग्य शिबिर वृक्षरोपण रक्तदान अशा अनेक कार्यक्रम दरवर्षी आयोजन करण्यात येते याही वर्षे वरील कार्यक्रम आयोजन करण्याचे आयोजिले आहे







### स्व.कोकिळ यांच्या पुण्यस्मरणार्थ वक्तृत्व स्पर्धा

केज । प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ, केज तसेच कोकिळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे संस्थापक सचिव स्व. विश्वंभर ( काका ) कोकिळ यांच्या ८ व्या पुण्यस्मरणार्थ मराठवाडा पातळीवरील भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धा केज येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदीर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये दि. २० ऑगस्ट २०२५ वार बुधवार रोजी पार पडली. या स्पर्धेमध्ये लहान गटातून आदर्श प्राथमिक विद्यालय घाटनांदुर या शाळेचा विद्यार्थी अर्णव दत्तप्रसाद सारडा तर मोठ्या गटातून स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा. वि. केज शाळेचा विद्यार्थी हरी रामप्रसाद चौरे यांनी सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जी. बी. गदळे सचिव, जीवन विकास शिक्षण मंडळ केज. तर बक्षीस वितरण समारंभ सत्राचे अध्यक्ष म्हणून अंकुशरावजी इंगळे अध्यक्ष जीवन विकास शिक्षण मंडळ केज, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर प्राचार्य, भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज. इतर मान्यवर उपस्थितीमध्ये संस्थेचे सहसचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु. अ. उपेंद्र कोकिळ, सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते.

## मिलिंद शिंदे यांना पीएचडी प्रदान

बीड । प्रतिनिधी



मराठी चित्रपट सृष्टीतील अनुभवी अभिनेते बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र मिलिंद रामदास शिंदे यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठातून पीएच डी ही पदवी प्रदान करण्यात आली. पीएचडी मिळाल्या बद्दल अभिनेते मिलिंद शिंदे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. मराठी चित्रपट सृष्टीतील अनुभवी अभिनेते तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र श्री मिलिंद रामदास शिंदे यांचे पाटोदा तालुक्यातील निरगुडी हे मूळ गाव आहे. त्यांचे वडील रा.जा. शिंदे हे बीड जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पबचत अधिकारी पदावर कार्यरत होते. पुढे त्यांनी कायद्याची पदवी घेऊन अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयात वकिली व्यवसाय सुरू केला होता. दरम्यान अभिनेता मिलिंद शिंदे हे अनेक वर्ष बीडच्या बीअँड सी क्वार्टर मध्ये वास्तव्य करत होते. त्यामुळे त्यांना बीड जिल्ह्यासह बीड शहराची खडा ना खडा माहिती आहे. अभिनयाची आवड असल्याने मिलिंद शिंदे यांनी नाटकाच्या माध्यमातून चित्रपट दुनियामध्ये पदार्पण केले.

# निजामकालीन तहसील इमारत जमीनदोस्त

## सय्यद एकबाल पेंटर यांची चौकशीची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील असणारी निजामकालीन बांधकाम असलेली शासकीय मालकीच्या सुस्थितीत तहसील इमारत पाडून जमीनदोस्त केल्याच्या प्रकाराची वरिष्ठ पातळीवर चौकशी होवून संबंधितावर कारवाई करावी व या इमारतीमध्ये असणाऱ्या साहित्य दरवाजे.गज.सह आदि गायब केले याची चौकशी करावी व इमारत पाडायची होती तर मग लाखो रुपये खर्चून दुरुस्ती कशाला केली असे निवेदनात सय्यद एकबाल पेंटर यांनी म्हटले आहे.

पाटोदा शहरात शासनाच्या मालकीच्या व ताब्यातील चांगल्या सुस्थितीत असलेल्या स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्यानंतरच्या ४० ते ५० वर्षापुर्वीच्या बांधलेल्या इमारती नुकत्याच उध्वस्त करण्यात आल्या आहेत. जेसीबी सारख्या मशीन वापरून व पहारीचा वापर करून त्या इमारती जमिनदोस्त करण्यात आलेल्या आहेत. या इमारतीमध्ये प्रामुख्याने पाटोदा तहसील कार्यालयाची दगडी बांधकाम असलेली चांगल्या स्थितीतील इमारत आहे. पाटोदा तहसील कार्यालयाची इमारतीची डागडूजी दोन वर्षापुर्वीच करण्यात आली यावेळी काही लाखो रूपये या दुरूस्तीवर खर्च करण्यात आलेले आहेत. शिवाय इमारतीची स्थिती ही मजबूत होती, इमारतीसाठी सागाच्या लाकडाचा वापर करण्यात आलेला होता. तसेच खिडक्या दारासाठी चांगल्या प्रतीचे लोखंड त्याकाळी वापरण्यात आलेले होते. ते आजही मजबुत स्थितीत होते. इमारत पाडल्यानंतर या महागडया सागाच्या लाकडाचे आणि मजबूत स्थितीत असलेल्या लोखंडी खिडक्या, दरवाजे, गेट याची काय विल्हेवाट लावली याची चौकशी करण्यात यावी. ही इमारत पाडण्याचे कारण काय?, पाडण्यापूर्वी तिची क्वालीटी निश्चीत केली गेली होती का, तिचा कोणता भाग पडण्याच्या स्थितीत होता का ? इमारत पाडायचीच होती तर तिच्यावर लाखो रूपये खर्च का करण्यात आले ? या मनमानी कारभारामुळे शासनाचे लाखो रूपयाचे नुकसान झालेले आहे त्याला जिम्मेदार कोण किंवा जो असेल त्याच्यावर कार्यवाही होईल का? या बाबत वरिष्ठ स्तरावर योग्य व नि:पक्षपाती पणे चौकशीची गरज आहे. पाटोदा शहरात आणखी एक जूनी दवाखान्याची चांगल्या स्थितीतील टकाटक



इमारत आहे. ज्या इमारतीत पोलीस स्टेशन कार्यरत आहे. ती पाडण्यासाठी आता तिच्यावर विषारी नजर आहे. ती पाडून पुन्हा नवी इमारत बांधायला राष्ट्राचा पैसा मातीमोल, निकृष्टदर्जाचे बांधकाम करायचे, शासनाचा निधी लाटायचा हाच सगळा खेळ, पाटोदा शहरातून वाहणा-या वांजरा/मांजरा नदीवर नया पुल झाला. जूना २२ कमानी दगडी पुल पाडून नवा बांध ला. आता दर तीन महिन्याची त्याची डागडुजी केली जावून त्यावर लाखो रूपये खर्च केले जात आहेत. तरी ही रस्त्याची अवस्था जशी आहे तशीच. त्यावरील एक ही खड्डा बुजला जात नाही. आता पुलावर कठड्यालगत उंच उंच लोखंडी संरक्षक जाळया बसविण्यात आलेल्या आहेत. त्याचा काय उपयोग आहे हे त्यांनाच माहित. विशेष म्हणजे या बांधकामावर बांधकाम विभागाला काही देणे घेणे दिसत नाही. सर्व सोपस्कार एजन्सीव्दारा पार पाडले जातात. पाणी आडवा पाणी जिरवा या योजनेवर शटर बंधारे, सिमेंट बंधारे, कोल्हापूर बंधारे केल्याचे दाखवून कोट्यावधी रुपयाची उधळपट्टी झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून ही योजना राबविल्याचे दाखवले गेले आहे. मग आता २०२५ साली यातील किती बंधारचे पाणी आडवले गेले व त्या किती शेतक-यांना व जनतेला फायदा झाला याची शहनिशा करून त्याची चौकशी होणे गरजेचे आहे. आडवलेल्या बंधा-याचे फोटोसह माहिती शासनाने घ्यावी आणि ही योजना ख-या अर्थाने राबविली गेली की नाही याची शहनिशा करण्यात येवून राबविली गेलीच नसेल तर या खर्चास जबाबदार कोण याची खातरजमा करावी.. क्रिडा संकुला बाबतही असेच काहीसे चित्र आहे. पाटोदा येथे क्रिडा संकूल मंजूर असून त्याच्यावर लाखो रुपये खर्च करण्यात आलेले आहेत तरी पण आता नवी जागा मिळण्यासाठी क्रिडाखात्याकडे मागणी करण्यात आलेली आहे. मग पहिल्या किडा संकुलाचे काय झाले ? शासनाचा पैसा सुरक्षित रहावा, योग्य वेळी योग्य त्या ठिकाणी त्याचा विनीयोग व्हावा आणि त्याचा फायदा जनतेच्या कल्याणासाठी विकासात्मक कामातून व्हावा याची दखल शासनाने वेळीच घ्यावी व अशा प्रकारचे अनेक प्रश्न तालुक्यात जिल्हयात आहेत त्या प्रश्नांची तातडीने माहिती घेवून ते प्रश्न मार्गी लागावेत हि इमारत पाडणारी एजन्सी व संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी पालकमंत्री ना.अजित दादा पवार.जिल्हाधिकारी बीड.बजरंग बप्पा सोनवणे, खासदार, बीड.आ. सुरेश धस,.आ. संदीप भैया क्षीरसागर.तहसीलदार तहसील कार्यालय, पाटोदा सह आदींना दिलेल्या निवेदनात सय्यद एकबाल पेंटर, दलितमित्र, सामाजिक कार्यकर्ते, पाटोदा यांनी म्हटले आहे

## नगरपंचायत प्रभारी अधिकाऱ्यामुळे जनता बेजार

### पाटोदा नगरपंचायतीला हक्काचा मुख्याधिकारी कधी मिळणार?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा नगरपंचायत गेल्या अनेक महिन्यांपासून प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरोशावरच चालत आहे. परिणामी येथील जनतेला वेगवेगळ्या कामांसाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पाणीपुरवठा,रस्ते दुरुस्ती, अशा महत्वाच्या कामांकडे योग्य वेळी लक्ष न गेल्याने नागरिकांमध्ये असंतोषाची लाट आहे.स्थानिक नागरिकाचे म्हणणे आहे की प्रभारी अधिकाऱ्यांकडे इतर ठिकाणची जबाबदारीही असल्याने नगरपंचायतीच्या कामकाजाकडे अपेक्षित लक्ष दिले जात नाही. त्यामुळे सोप्या कामांसाठीसुद्धा नागरिकांना वारंवार चकरा माराव्या लागतात.यामुळे नागरिकांचे एकच प्रश्न आहे की पाटोदा नगरपंचायतीला कायमस्वरूपी मुख्याधिकारी



कधी मिळणार ?विकास कामे, शासकीय योजना, तसेच नागरिकांच्या दैनंदिन अडचणी यावर योग्य तो निर्णय घेण्यासाठी सक्षम व पूर्णवेळ मुख्याधिकारी आवश्यक असल्याची मागणी सर्व जनते कडून होत आहे.

## मंझरी घाट येथे बंद शाळेच्या खोलीत १४ लाखांचा गुटखा पकडला

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मंझरी घाट येथे गुरुवारी दुपारी चार वाजता च्या दरम्यान आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी हनपुडे पाटील यांच्या पथकाने दमदारी कामगिरी करत जिल्हा परिषदेच्या बंद शाळेत असणाऱ्या खोलीमध्ये १४ लाख ४२ हजार रुपयांचा अवैधरित्या साठवून ठेवलेला गुटखा पकडला असून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती.

राज्यात सध्या गुटखाबंदी असतानाही पाटोदा तालुक्यातील मंझरी घाट येथे जिल्हा परिषद च्या बंद शाळेच्या खोलीमध्ये १४ लाख ४२ हजार रुपयांचा अवैधरित्या गुटखा साठा केलेला अप्पर पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी हनपुडे पाटील यांच्या पथकाने दमदार कामगिरी करून पकडला असून या कामगिरीमध्ये पोलीस अंमलदार शिंदे .खाडे .पोलीस जाधव. पोलीस निरीक्षक सहाय्यक भाबड. पोलीस हवालदार सांगळे. डोके. या पथकामध्ये होते तर पीएसआय कृष्णा चव्हाण यांच्या फिर्यादीवरून अशोक गीते.रा.मंझरीघाट सह आदीवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पाटोदा पोलीस स्टेशनमध्ये रात्री उशिरापर्यंत चालू होती. या धाडसी धाडीमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

## पाटोदा तालुक्यातून लाखोंच्या संख्येने मराठा समाज बांधव मुंबईला जाणार

पिंपळवंडी । प्रतिनिधी

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला आहे. लाखोंच्या संख्येने मराठा बांधव मुंबईला येणार असल्याची माहिती मिळत आहे.पाटोदा तालुक्यातील लाखोच्या संख्येने मराठा बांधव मुंबईला येणार आहेत.त्यासाठी पाटोदा तालुक्यातील मराठा सेवक कामाला देखील लागले आहेत. रात्रंदिवस वाडी-वस्तीवर बैठका घेऊन पोम्प्लेट देऊन मुंबईला येण्यासाठी आवाहन करत आहेत.मराठा सेवक गजानन बेदरे,सुग्रीव पवार,राहुल कवठेकर यांच्यासह हजारो मराठा बांधव रात्रंदिवस एक करत मराठा समाजामध्ये जनजागृती करून २९ ऑगस्टला मुंबईच्या दिशेने निघण्यासाठी आवाहन करत आहेत.



२७ ऑगस्ट रोजी अंतरवली पासून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या आंदोलनासाठी लाखो मराठे निघणार आहेत. आंतरवालीशहागडपैठण मार्ग शेवगावपांढरी पुलआळेफाटा शिवनेरी दर्शनकल्याण चेंबूर आझाद मैदान असा मार्ग ठरवण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी लाखोंच्या संख्येने मराठा बांधव या रॅलीत सहभागी होणार आहेत.ठिकठिकाणी जंगी स्वागत केलं जाणार आहे.या रॅलीत पाटोदा तालुक्यातील देखील लाखो बांधव सहभागी होणार असून त्यासाठी जनजागृती मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.मराठा सेवकांनी रात्रंदिवस एक करून रॅलीत लाखोच्या संख्येने मराठा बांधव सहभागी होऊन आझाद मैदानाच्या दिशेने निघावेत यासाठी जनजागृतीच रान पेरले जात आहे.ही जनजागृती भविष्यासाठी आहे सगे-सोयरे जीआर तात्काळ मंजूर करण्यासाठी आहे सगळे सोयऱ्याचा कायदा पारित केल्याशिवाय मुंबई सोडणार नाही असा ठाम निश्चय केला आहे.ही लढाई शेवटची असल्याने गेल्या वेळेस पेक्षा दुप्पट संख्येने मराठा बांधव या २९ ऑगस्टच्या आंदोलनात सहभागी होणार आहेत.असंही बोललं जात आहे... पाटोदा तालुक्यातून लाखोच्या संख्येने मराठा बांधव सहभागी होणार आहेत आपणही मोठ्या संख्येने सहभागी व्हा असे आवाहन मराठा सेवक गजानन बेदरे,सुग्रीव पवार, राहुल कवठेकर यांच्यासह पाटोदा तालुक्यातील सर्व मराठा सेवकांकडून करण्यात आले आहे.पिंपळवंडी येथे दि.२१ गुरुवार रोजी मराठा समन्वयक यांनी बैठक घेतली.यावेळी गजानन बेद्रे,सोन्याबापु पवार,राजेश पवार यांनी मोलाचे मार्गदर्शन करून आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.यावेळी परिसरातील समाज बांधवांनी यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन मुंबई गाठण्याचा निर्धार केला.

## पान ६ वरुन...

### पारंपारिक पध्दतीने बैलपोळ्याची

सोमनाथ शेटे,पंचाक्षरी शेटे यांच्यासह कुटुंबीयांची उपस्थिती होती.महाराष्ट्र कृषिप्रधान राज्य म्हणून ओळखले जाते.कृषी संस्कृती सण उत्सवाच्या माध्यमातून जपली जाते.पोळा हा त्यातीलच महत्त्वाचा सण होय. माजलगावातील पोळ्याच्या मिरवणुकीचा मान पूर्वीपासूनच आमच्या कुटुंबियांकडे आहे, याचा सार्थ अभिमान वाटतो. यावर्षीही मिरवणुकीचा मान मिळाला,या मिरवणुकीत शेतकरी, आप्तस्वकीय मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते,अशी प्रतिक्रिया विश्वनाथ शेटे यांनी दिली.''

### महसूल सप्ताहात बीड तालुक्यातील

तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , अव्वल कारकून हेमलता परचाके , सहाय्यक वैशाली बहिरवाड आणि संगणक परिचालक महेंद्र राऊत यांनी विशेष मेहनत घेतली .लाभार्थ्यांच्या सोयीसाठी तहसील कार्यालयात स्वतंत्र बसण्याची व्यवस्था देखील करण्यात आली आहे . महसूल सप्ताह २०२५ मधील या उपक्रमांमुळे बीड तालुक्यातील गरजूंना पहिल्यांदाच घरबसल्या आर्थिक मदत आणि ऑनलाइन हयात प्रमाणपत्राची सुविधा मिळाली असून महसूल विभागाने सामाजिक न्याय , पारदर्शकता आणि तत्पर सेवा यांचा ठसा उमटवत इतर तालुक्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे .

### पद्मश्री डॉ. लहाने करणार

सदस्य विलास डोळसे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय आरबुणे ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर ,जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, सचिन पवार,अविनाश कदम, जुनेद बागवान, दिलीप झगडे, संजय रानभरे, गौतम बचुटे ,कादर मकरानी , तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, मधुकर तौर, जालिंदर नन्नवरे ,अजय जोशी, हरीश यादव, विजय आरकडे, सतीश सोनवणे, मंगेश नीटूरकर, प्रशांत लाटकर आदींनी केले आहे.

### युसूफवडगाव येथे बैलपोळा सण

उत्साहात साजरा होणार यात तिळ मात्र शंका नव्हती.त्यामुळे शेतकऱ्यांनी वाजतगाजत आपल्या बैलांची मिरवणुक काढत बैलपोळा सण उत्साहात साजरा केलला असला तरी या सणाच्या निमित्ताने एक गोष्ट प्रखश्याने जाणवली ती शेतकऱ्याकडील पशुधनाची कमतरता कधी दुष्काळ,तरी कधी लंम्पी सारखा रोग तर कुठे चारा पाण्याची कमतरता यामुळे बोटावर मोजता येईल ऐवढ्याच आणि हौशी शेतकऱ्यांनाकडे सध्या बैलजोड्या आहेत.आणि अशा हौशी शेतकऱ्यांना मुळेच बैलपोळ्या सारखा काळ्या मातीशी घट्ट नात असलेला सण टिकुन आहे.

### धानोरा रोडवरील रेल्वे

गेला आहे. या मार्गावरून दैनंदिन कामासाठी शहरात येणाऱ्या शेकडो नागरिकांना पर्यायी मार्ग म्हणून पुलावरील रेल्वे रुळाच्या बाजूनेच वाहतूक करावी लागत होती. मात्र रेल्वे प्रशासनाने शुक्रवारी पर्यायी मार्गावरील मुरूम हटवण्याचे काम अचानक सुरू केल्याने नागरिकांचा एकमेव उरलेला मार्गही बंद झाला. त्यामुळे वरवंटी आहेर धानोराचे ग्रुप ग्रामपंचायतचे उप सरपंच प्रदीप कोटुळे यांच्यासह ग्रामस्थांनी तातडीने रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले. काही काळासाठी संपूर्ण वाहतूक ठप्पझाली. नागरिकांनी रोष व्यक्त करत घोषणाबाजी केली. या प्रकारची माहिती खासदार बजरंग सोनवणे यांना कळल्यानंतर त्यांनी प्रशासनाशी संपर्क साधला. त्यानंतर नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनाने ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेत रुळावरील मुरूम काढण्याचे काम थांबवण्याचे आदेश दिले. पुलाखालील असलेले पाणी उपसून रस्ता मोकळा होईपर्यंत रेल्वे रुळाच्या बाजूने वाहतूक सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाच्या या आश्वासनावर ग्रामस्थांनी आंदोलन शांततेत मागे घेतले.

कायमचा प्रश्न सोडवा, सोमवारी पुन्हा आंदोलन

धानोरा रोडवरील रेल्वे पुलाखाली पाणी साचणे दरवर्षी पावसाळ्यात होणारी नित्याची समस्या आहे. यामुळे ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागतो. यामुळे येत्या सोमवारी पर्यंत पुलाखाली साचलेले पाणी प्रश्न कायम मार्गी लावावा अन्यथा मंगळवारपासून रेल्वे पुलाखाली आंदोलन करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे असे उपसरपंच प्रदीप कोठुळे यांनी प्रशासनाला सुनावले. दरम्यान सामाजिक कार्यकर्ते अशोक सुखवसे यांनी खासदार बजरंग सोनवणे आणि प्रशासनामध्ये समन्वय साधून ग्रामस्थांचे आंदोलन मागे घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

-------------


## भारतीय सैन्य दलातील लक्ष्मीकांत वारुंगळे यांची कन्या अनुष्का नीट परीक्षेत चांगल्या गुणाने उत्तिर्ण

आष्टी। प्रतिनिधी

भारतीय सैन्यदलातील लक्ष्मिकांत वारुंगळे अधिकाऱ्यांची कन्या स्व अर्जुन सदाशिव वारुंगुळे यांची नात अनुष्का वारूंगळे यांनी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा नीट २०२५ मध्ये उत्कृष्ट गुण मिळवून आपल्या जिद्द चिकाटी परिश्रम घेऊन मोठ्या जिद्दीने अभ्यास करून आपल्या कुटुंबासह समस्त वारुंगळे परिवाराची मान उंचावली आहे . आपण देखील आपल्या वडिलांप्रमाणेच भारतीय सैन्य दलातच वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करण्याची माझी देखील इच्छा आहे अशी अनुष्काने भावना व्यक्त केली. वैद्यकीय महाविद्यालयात एम बी बी एस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे.

अनुष्का ह्या लष्करी अधिकारी (जेसीओ) लक्ष्मीकांत वारुगंळे यांची कन्या आहे

लक्ष्मीकांत अर्जुन आणि पल्लवी वारुंगुळे यांच्या कन्या आहेत. लष्करी पार्श्वभूमीमुळे देशातील विविध राज्यामधील आर्मी पब्लिक स्कूलमध्ये त्यांचे शिक्षण झाले. त्यांनी दहावीची परीक्षा सी बी एस ई बोर्डामधून ९६ टक्के उत्तीर्ण होऊन तिच्या स्कूलमध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला होता. आर्मीमध्ये डॉक्टर होण्याचे स्वप्न; सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव त्यानंतर, त्यांनी सिंधफणा पब्लिक स्कूल माजलगाव मध्ये



प्रवेश घेतला. तेथे त्यांनी १२ वीची परीक्षा ९४.२% गुणांसह उत्तीर्ण करून संपूर्ण शाळेमध्ये सर्वोच्च स्थान मिळवले. या शैक्षणिक वर्षामुळे त्यांना आंबेजोगाई येथे सन्मान समारंभात गौरविण्यात आले. फक्त शालेय शालेय जीवनातच ती कुशाग्र बुद्धीची व अभ्यास वृत्तीची होती दिल्या. (कॉमन बुनिवर्सिटी एंटुन्स टेस्ट) मध्ये त्यांना १२५० पैकी ९५० गुण मिळाले, ज्यामुळे दिल्ली विद्यापीठासारख्या मध्ये प्रवेश मिळणे निश्चित झाले. तथापि, त्यांचे लक्ष नीट कड़े होते, जे त्यांनी पूर्ण केले आणि एम बी बी एस च्या शासकीय जागेसाठी ती पात्र ठरली , त्यांचे वडील, ज्युनिअर कमिशन ऑफिसर, त्यांच्या यशाने अत्यंत भावुक झाले आहेत. अनुष्का म्हणते की ''लष्करी वातावरणात वाढल्यामळे देश सेवेची भावना मनामध्ये रुजली, वैद्यकीय क्षेत्रातून देशाची सेवा करणे हे माझे ध्येय आहे. माझे सर्व यश माझ्या आई-वडिलांच्या समर्पण आणि मार्गदर्शनाला द्यावे लागेल. ''अनुष्काच्या पुढच्या योजना स्पष्ट आहेतः एम बी बी एस पूर्ण केल्यानंतर भारतीय सशस्त्र दलामध्ये डॉ म्हणून नोकरी करणे. त्यांच्या वा यशाने इतर युवकांनाही कठोर परिश्रम जिद्द चिकाटी ठेवल्यास नक्कीच यश हमखास मिळते . संपूर्ण नगर वासियांनी अनुष्का वारंगुळे यांच्या यशाचे आष्टी तालुक्यातील सर्व स्तरातून अभिनंदन केले आहे आणि श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथे नंबर लागला असल्याने त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तिच्या या यशाबद्दल लोकनेते आष्टीचे आमदार सुरेश आण्णा धस आष्टी नगरपंचायत चे सभापती सुरेश आबा वारुंगळे यांनी अभिनंदन करून तिला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## रस्ते,स्वच्छता,लाईट, पाण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

शहरातील नागरिकांच्या मुलभूत सुविधांसाठी नागरिकांच्या वतीने शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी साहेब आणि मुख्याधिकारी साहेब यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले आहेत, निवेदनात म्हटले आहे की बीड शहरात अस्वच्छता पसरलेली आहेत, १५ ते २० दिवसाला पाणी मिळतो, सहा सहा महिने विद्युत खंब्यावर लाइट बंद असते, विशेष म्हणजे बीड शहरातील रस्ते अत्यंत खराब झालेले आहे म्हणून रोड रस्ते नाल्यांची विकास कामे त्वरित सुरू करण्यात यावी तसेच कंकालेश्वर मंदिर ते हजरत शहेंशावली दर्गा रोडवरील पूल तुटलेले आहे तुटलेल्या पुलावरून अनेक नागरिक नाल्यांमध्ये पळून दुःखापत होत आहे, तसेच किल्ल्या मैदानावर नगरपरिषदेचे शादीखाना बांधलेला होता त्याची देखभाल नसल्यामुळे ते खंडर झाले असून त्याची दुरुस्ती करून घ्यावी, नगरपरिषदेतील भ्रष्टाचार दिसून येत आहेत त्यावर आळा बसला पाहिजे, नविन रोड नाल्या होतांना दिसत नाहीये मात्र कोट्यवधीचे बिले निघालेले आहेत. जुनेच कामाचे नवे किंवा डबल बिले दिली जाते असे वाटत आहे म्हणजे बीड नगरपरिषदेत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार वाढलेला दिसून येत आहे, प्रशासकाच्या नावाखाली मनमानी अंधाधुंद कारभार सुरू आहेत, स्वच्छतेसाठी,पाणीसाठी, लाईटसाठी आणि रस्ते नाल्यांचे विकास कामांसाठी आपण स्वतः विशेष लक्ष द्यावे अशी मागणी जिल्हाधिकारी साहेब आणि व मुख्याधिकारी साहेब यांच्याकडे केली आहे यावेळी रहिम भाई,महेबुब इनामदार,वडमारे साहेब,शेख मुबारक,हमीद भाई, मोमीन अझहर आदी मान्यवर उपस्थित होते,

# कोल्हापूरच्या धर्तीवर नांदेड जिल्ह्याला विशेष पॅकेज द्या !

## अंबादास दानवे यांची मागणी ; कृषीमंत्र्यांवर केली टीका

नांदेड

गेल्या चार दिवसांपुर्वी राज्यात मुसळधार पाऊस झाला आहे यामुळं अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. तसेच शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. सर्वात मोठा फटका मराठवाड्याला बसला आहे. राज्यात सर्वाधिक नुकसान हे नांदेड जिल्ह्यात झालेले आहे. त्यामुळं सरकारनं कोल्हापूरच्या धर्तीवर नांदेड जिल्ह्यासाठी विशेष पॅकेज द्यावे अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते आज नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील पूरग्रस्त गावांची पाहणी करण्यासाठी आले होते.

यावेळी अंबादास दानवे यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर देखील टीका केलीय. कृषीमंत्र्यांची पाहणी म्हणजे निव्वळ फार्स असल्याचे दानवे म्हणाले. नांदेडासाठी विशेष पॅकेज द्यावं अशी मागणी यावेळी दानवे यांनी केली आहे. राज्याचे कृषी मंत्री हे नांदेड जिल्ह्यात आले होते. त्यांनी नुकसानीचे पाहणी करण्याचा दौरा केला तो निव्वळ फार्स असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. वाशिम येथून परत येताना रस्त्यावर उभे राहून



त्यांनी २० मिनिटांत पाहणी उरकली. त्यामुळं हा फार्स असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. अतिवृष्टीमुळे राज्यातील १९ जिल्ह्यात २० लाख १२ हजार ७७५ एकर क्षेत्रावरील सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासह अन्य पिकांचं नुकसान झाल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम मध्ये पत्रकार परिषदेत बोलताना दिली. राज्यात सर्वाधिक ७ लाख १३ हजार ८५७ एक्कर क्षेत्राचे नुकसान नांदेड जिल्ह्यात झाला असून त्यापाठोपाठ वाशिम जिल्ह्यात ४ लाख ११ हजार ३९२ एकर क्षेत्रावर पिकाचे नुकसान झालंय. मात्र क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केल्यास सर्वाधिक नुकसान वाशिम जिल्ह्यात असल्याचही भरणे यांनी सांगितले, या नुकसानीचे पंचनामे सुरू असून अहवाल मिळाल्यानंतर तात्काळ शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचं भरणे यांनी सांगितलंय. पावसामुळे पाणीपुरवठा, वीज आणि वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला आहे. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली होती.

### सर्वाधिक नुकसानग्रस्त जिल्हे कोणते?

नांदेड – २८५५४३ हेक्टरवरकील पिकांचे नुकसान
वाशिम – १६४५५७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान
यवतमाळ – ८०९६९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान
बुलढाणा – ७४४०५ हेक्टरवरल पिकांचे नुकसान
अकोला – ४३७०३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान
सोलापूर – ४१४७२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान
हिंगोली – ४०००० हेक्टरवरील पिकांचे नुकसान

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३९ : युनायटेड किंगडमने हाँगकाँगचा ताबा घेतला.
१९१४ : पहिले महायुद्ध जपानने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४२ : मो. ग. रांगणेकर यांच्या 'कुलवधु' नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९४२ : दुसरे महायुद्ध स्टालिनग्राडची लढाई सुरू
१९६६ : 'लूनार ऑर्बिटर-१' या मानवरहित अंतराळयानाने चंद्रावरून पहिल्यांदाच पृथ्वीची छायाचित्रे काढली.
१९९० : आर्मेनियाने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९९१ : वर्ल्ड वाईड वेब सार्वजनिक उपयोगासाठी सुरु झाले.
१९९७ : हळदीच्या पेटंटबाबतचा अमेरिकेशी चालू असलेला कायदेशीर लढा भारताने जिंकला. एखाद्या विकसनशील देशाने अमेरिकन पेटंटला आव्हान देऊन तो जिंकण्याची ही पहिलीच घटना आहे.
२००५ : कविवर्य विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान
२०११ : लीबीयातील हुकुमशहा मुअम्मर गडाफीची सत्ता उलथण्यात आली.
२०१२ : राजस्थानात अतिवृष्टीमुळे ३० जण ठार!

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५४ : लुई (सोळावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ जानेवारी १७९३)
१८५२ : भारतीय वैद्य आणि दानकर्ते राधा गोबिंद कार यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९१८)
१८७२ : भारतीय वकील आणि राजकारणी तांगुतरी प्रकाशम यांचा जन्म. (मृत्यू: २० मे १९५७)
१८७५ : भारतीय स्वतंत्रतासेनानी व चंपारण्य संग्रहाचे प्रमुख सदस्य राजकुमार शुक्ल यांचा जन्मदिन.
१८९० : न्यूज-डे चे सहसंस्थापक हॅरी फ्रँक गग्नेहॅम यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९७१)
१९१८ : गोविंद विनायक तथा 'विंदा' करंदीकर लेखक, कवी, लघुनिबंधकार व टीकाकार.
१९४४ : सायरा बानू चित्रफट अभिनेत्री
१९५१ : नूर जॉर्डनची राणी
१९७३ : मलाईका अरोरा खान मॉडेल व अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३४ : अबू बकर अरब खलिफा (जन्म: ? ? ५७३)
१३६३ : डहाण राजवटीचे संस्थापक चेन ओंलियांग यांचे निधन.
१८०६ : चार्ल्स कुलोम फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १४ जून १७३६)
१८९२ : ब्राझीलचे पहिले अध्यक्ष डियोडोरो डा फोन्सेका यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८२७)
१९७१ : रतन साळगावकर ऊर्फ हंसा वाडकर मराठी व हिन्दी चित्रपट अभिनेत्री (सांगत्ये ऐका, लोकशाहीर रामजोशी, विजयाची लग्ने, संतसखू, रामशास्त्री, आजाद, नवजीवन, धन्यवाद, मेरे लाल). 'सांगत्ये ऐका' नावाचे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध आहे. (जन्म: २४ जानेवारी १९२४)
१९७४ : डॉ. शंकर दामोदर पेंडसे मराठी ग्रंथकार आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक. पंढरपूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे (१९५५) ते अध्यक्ष होते. (जन्म: २८ फेब्रुवारी १८९७)
१९७५ : पं. विनायकराव पटवर्धन नामवंत शास्त्रीय गायक, गुरू, संगीतप्रसारक व अभिनेते. १९३२ मध्ये त्यांनी पुण्यात गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. (जन्म: २२ जुलै १८९८)
१९९४ : आरती साहा इंग्लिश खाडी पोहून जाणारी पहिली भारतीय महिला जलतणपटू (जन्म: २४ सप्टेंबर १९४०)
१९९७ : ग्रेनाडा चे पहिले पंतप्रधान एरिक गेयरी यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी १९२२)
२००३ : भारतीय कन्नड भाषिक लेखक ए. एन. मूर्ती राव यांचे निधन.
२०१३ : आर.जे. कॉमन रेल्वेमार्ग गटाचे संस्थापक रिचर्ड जे. कॉर्मन यांचे निधन. (जन्म: २२ जुलै १९५५)

# दुग्धज्वर आजाराची लक्षणे, कारणे आणि उपाय



साधारपणे गाई आणि म्हशींमध्ये दुग्धज्वर आजार पाहायला मिळतो. दुग्धज्वर आजारालाच मिल्क फिवर असेही म्हणतात. हा आजार मुख्यत्वे संकरित गाई व म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. दुग्धज्वर रोग प्रामुख्याने रक्तातील कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हा रोग होतो. हा आजार संकरित गाई व म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. तसेच या रोगाचा प्रार्दुभाव ५ ते १ वर्षे वयाच्या गाई आणि म्हशींमध्ये जास्त आढळून येतो. गाई, म्हशीं विल्यानंतर त्यांच्या शरिरीतील कॅल्शियम कमी होत असल्याने विल्यानंतर काही दिवसांतच या रोगाची लक्षणे दिसून येतात.

आजाराची लक्षणे :या आजारातील सूरूवातीचे काही दिवस प्रार्दुभाव कमी असल्याने लक्षणे लवकर लक्षात येत नाही. या आजारात जनावर सुस्त होते. चारा खाणे खाते त्यामुळे दूध कमी देते . सतत डोके हलविणे , जीभ बाहेर काढणे , दात खाणे, शरीर थंड पडणे, शेण व लघवी बंद करणे त्यामुळे रवंथ करणे थांबून पोट फुगणे, अडखळत चालणे, या आजाराची लागण झाल्यास अशक्तपणामुळे जनावरे जास्त वेळ उभे राहू शकत नाही. या रोगाचा प्रार्दुभाव जास्त झाल्यास जनावरचा श्वास मंद होतो. लावला असता पापण्यांची हालचाल होत नाही. या अवस्थेत उपचार झाला नाही, तर जनावर दगावते.

आजाराची कारणे :रक्तातील कॅल्शियमचे प्रमाण कमी होणे हे या आजाराचे मुख्य कारण आहे. जनावरांना चाऱ्यातून कमी प्रमाणात कॅल्शियम मिळणे. जनावरांच्या आहारात कॅल्शियम व स्फुरदाचे योग्य प्रमाण नसणे. 'ड' जीवनसत्वाची कमतरता होणे. विण्यापूर्वी किंवा विल्यानंतर जनावराची होणारी उपासमार तसेच विण्याच्या सुमारास जनावरावर येणारा ताण हे ही या आजाराचे कारण होवू शकते. हिरवा चारा न मिळणे व जास्त दूध उत्पादन या कारणांनी हा आजार मोठ्या प्रमाणात जनावरांमध्ये आढळतो.

उपाय :जनावरास विण्यापूर्वी सकस आहार द्यावा. गाभण काळात जनावराची उपासमार होवू नये याकडे विषेश लक्ष द्यावे. गाभण काळात जनावरांना हिरवा चारा द्यावा. त्यामुळे जनावरांच्या शरिरातील कॅल्शियमची कमतरता भरून निघते.गाभण आणि दुधाळ जनावरास उसाचे वाढे जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. पशुवैद्याच्या सल्ल्यानुसार उपचार करावेत. विण्यापूर्वी साधारण एक आठवडा जीवनसत्व ड'चे इंजेक्शन देणे.

# उन्हाळी मुग लागवड तंत्रज्ञान

पिकाची उगवण झाल्यानंतर १० दिवसांनी नांगे भरावेत आणि आवश्यकतेनुसार पिकाची बारून विरळणी करून घ्यावी. साधारणपणे १५ ते १८ दिवसांनी करून कोळपणी करावी. तसेच ४० दिवसांनी बेणणी करावी. मूग या पिकाला मध्यम ते भारी स्वरूपाची जमीन मानवते. जमिनीची उभी-आडवी नांगरट करून ढेकळे फोडून माती बारीक करावी. फळी मारून जमीन सपाट करावी. योग्य आकाराचे सपाट वाफे करून दोन वाफ्यामध्ये पाण्याचे पाट ठेवावेत. मुगाची लागवड उन्हाळी हंगामात करावी. कमी कालावधीचे पीक असल्याने जानेवारी ते फेब्रुवारीच्या दरम्यान मुगाची पेरणी करावी.

पेरणी अंतर व हेक्टरी बियाणे : लागवडीसाठी ३० सें.मी. १० सें.मी. अंतर ठेवावे. हेक्टरी १५ ते २० जणांच्या किलो बियाणे वापरावे. बियाण्याला प्रती किलोस २.५ ग्रॅम प्रमाणे प्रथम बुरशीनाशकाची आणि शेवटी पेरणीपूर्वी २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी. खते : हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद पेरणीपूर्वी सरीमध्ये बियाण्याखाली देऊन मातीमध्ये करावी. मिसळून घ्यावे व त्यानंतर पेरणी करावी. पाणी व्यवस्थापन : या पिकाला १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाच पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. काची फांद्या फुटण्याची वेळ, पीक फुलोऱ्यात असताना आणि शेंगामध्ये दाणे भरण्याच्या काळात पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी. आंतरमशागत : पिकाची उगवण झाल्यानंतर १० दिवसांनी नांगे भरावेत आणि आवश्यकतेनुसार पिकाची बारून विरळणी करून घ्यावी. साधारणपणे १५ ते १८ दिवसांनी करून कोळपणी करावी. तसेच ४० दिवसांनी बेणणी करावी. पीक संरक्षण : पाने खाणारी अळी, तुडतुडे व मावा या किडींपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी गरजेनुसार ६०० मि.ली. प्रवाही मोनोक्रोटोफॉस ५०० लि. पाण्यात सरी मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारा द्यावा. करपा रोगांचा १५ प्रादुर्भाव आढळल्यास एक लीटर पाण्यात २.५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड या प्रमाणात मिसळून फवारणी करावी

कापणी : शेंगा पक्व झाल्यानंतर म्हणजेच पेरणीनंतर साधारणतः ६० ते ७० दिवसांनी या पिकाच्या शेंगांची तोडणी करावी. शेंगांचा हिरवा रंग बदलून तो पिवळसर तपकिरी होऊ लागतो. त्यावेळी शेंगा तोडणीस तयार होतात. उशिरा वा कडक उन्हात तोडणी करू नये अन्यथा शेंगा तडकून उत्पन्नात घट होते. शेंगांची तोडणी शक्यतो सकाळी करावी म्हणजे शेंगा तडकत नाहीत. पक्व शेंगाची मोडणी दोन ते तीन वेळा करावी. त्यानंतर शेंगा उन्हामध्ये २ ते ३ दिवस सुकविल्यानंतर काठीच्या साहाय्याने दाणे वेगळे करावेत व स्वच्छ करावेत.



# अननसाच्या पानांपासून गाई-म्हशींसाठी बनवा पौष्टिक चारा

शेतीसोबतच पशुपालन करून शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यासाठी शासनाकडून अनेक प्रकारच्या योजना राबविण्यात येत असून त्यातून त्यांना लाभ मिळत आहे. भारतातील दुधाचे उत्पादन दुधाच्या मागणीच्या प्रमाणात कमी असल्याने देशातील दुधाचे उत्पादन वाढविण्याच्या दिशेने सरकार प्रयत्नशील आहे. दूध उत्पादन वाढवण्यासाठी शेतकरी हंगामानुसार जनावरांना हिरवा व सुका चाराही देतात. परंतु पौष्टिक चाऱ्याच्या कमतरतेमुळे जनावरांच्या दूध उत्पादनावर परिणाम होत आहे. दुभत्या जनावरांना कोणत्याही प्रकारचा चारा देता येत नाही, कारण त्यांची दूध उत्पादन करण्याची क्षमता चाऱ्यावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्यासाठी त्यांना पोषक चारा देणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) अननसाच्या पानांपासून पौष्टिक चारा बनवण्याची पद्धत सुचवली आहे, ज्यामुळे जनावरांचे दूध उत्पादन एक ते दीड किलोने वाढू शकते. विशेष म्हणजे हा चारा जनावरांच्या आरोग्यासाठी तर चांगला आहेच पण दुधाचे प्रमाण वाढवण्यासही उपयुक्त आहे.



जनावरांच्या चाऱ्यात अननसाच्या पानांचा वापर : भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या म्हणण्यानुसार अननसाची पाने शास्त्रोक्त पद्धतीने जतन करून चारा बनवता येतो. या चाऱ्याला टोटल मिक्स्ड रेशन म्हणतात. या एकूण मिश्र रेशनमध्ये अनेक खाद्यपदार्थ एकत्र मिसळून जनावरांना खायला दिले जातात. टीएमआरमध्ये चाऱ्यासोबत संपूर्ण कापूस सरकी, धान्ये, प्रथिने, खनिजे आणि जीवनसत्त्वे मिसळून गायी आणि म्हशी दुभत्या जनावरांसाठी खाद्य तयार केले जातात. याप्रमाणेच अननसाच्या पानांचाही टीएमआर पशुखाद्य तयार करण्यासाठी वापर केला जाऊ शकतो. केरळमधील एर्नाकुलममध्ये अननसाच्या पानांचा वापर जनावरांचा चारा बनवण्यासाठी केला जात आहे. केरळमध्ये अननसाची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. अशा परिस्थितीत जनावरांचा चारा बनवण्यासाठी त्याची पाने वापरली जात आहेत.


पौष्टिक चारा बनविण्यासाठी

नुसार, सर्वप्रथम अननसाच्या पानांची वर्गवारी करावी. कापलेली किंवा खराब झालेली पाने त्यातून काढून टाकावीत. आता फक्त १०० किलो चांगली पाने घ्या आणि त्यात २ किलो गूळ मिसळा. या मिश्रणात अर्धा किलो मीठ देखील घालायचे आहे. आता हे संपूर्ण मिश्रण हवाबंद भांड्यात बंद करून ठेवावे. हा टीएमआर काही दिवसात तयार होईल. हा जनावरांसाठी अत्यंत सकस चारा असल्याचे सांगितले जाते.

अननसाच्या पानांचा चारा जनावरांना किती प्रमाणात द्यावा? : अननसापासून तयार केलेला हा चारा जनावरांना एका दिवसात ५ ते १० किलो खाऊ घालू शकतो. त्याचे प्रमाण वाढवण्यासाठी त्यात अधिक गवत वगैरे घालता येईल. या टीएमआरमध्ये गवत, कोरडा चारा आणि धान्य मिसळून तुम्ही तुमच्या जनावरांना खाऊ शकता.

अननसाच्या पानांचा चारा खाऊन दुधाचे प्रमाण किती वाढवता येते? : अननसात व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते. याशिवाय यामध्ये व्हिटॅमिन ए, बी६, ई आणि के देखील असते. यामध्ये कॅल्शियम, फोलेट, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम आणि झिंक असते. त्यात पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळतात. अशाप्रकारे, त्याच्या पानांमध्ये देखील भरपूर पोषक असतात जे प्राण्यांच्या आरोग्यासाठी चांगले असतात. अननसाची पाने चारा म्हणून दिल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहते आणि त्याची दूध देण्याची क्षमताही वाढते. अननसाच्या पानांचा चारा दिल्यास जनावरांचे दूध उत्पादन एक ते दीड लिटरने वाढू शकते, असे सांगितले जात आहे. त्याचबरोबर दुधातील फॅटचे प्रमाणही ०.३ ते ०.५ टक्क्यांनी वाढू शकते. एकंदरीत अननसाच्या पानांपासून बनवलेला चारा हा जनावरांसाठी उत्कृष्ट चारा ठरू शकतो.

# खरीप पीकविमा योजनेला कमी प्रतिसाद



प्रधानमंत्री खरीप पीकविमा योजनेला खानदेशात यंदा कमी प्रतिसाद मिळाला आहे. परतावे न मिळणे, विमा कंपनीची मनमानी व परिमाणके बदलून उंबरठा उत्पादन हा निकष ठेवल्याने या योजनेकडे यंदा अनेकांनी पाठ फिरविल्याची स्थिती आहे.

यंदा फक्त उंबरठा उत्पादन हे परिमाणक या पीकविमा योजनेसंबंधी आहे. मागील वेळेस एक रुपयात पीकविमा योजनेत काढणीपूर्व, काढणीपश्चात नुकसान, पाऊस आदी बाबींत नुकसानीसंबंधी परतावे देय होते. परंतु या योजनेतून मागील वेळेस परतावे अनेकांना मिळाले नाहीत. ओला दुष्काळ होता. परंतु उंबरठा उत्पादनाचा निकष व अन्य परिमाणकांमुळे कापूस, सोयाबीन व अन्य पिकांसंबंधी नुकसान होवूनही परतावे मिळाले नाहीत. शासन या योजनेचा गवगवा करते, परंतु भरपाई मिळत नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. नंदुरबारात मागील वर्षी ८८ हजारांवर शेतकरी या योजनेत सहभागी झाले होते. यंदा सुमारे ११ हजार शेतकरी सहभागी झाले आहेत. जळगाव जिल्ह्यात यंदा सुमारे सव्वातीन ५५ हजार शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग नोंदविला आहे. धुळ्यात सुमारे दीड लाख शेतकऱ्यांनी खरिपात विविध पिकांसाठी विमा संरक्षण घेतले होते. यंदा १४ शेतकरी योजनेत सहभागी झाले आहेत. या योजनेत किडींमुळे होणाऱ्या नुकसानीबाबत परतावे मिळत नाहीत. यंदा अतिवृष्टी व दुष्काळ यासंबंधी नुकसान भरपाई किती मिळेल, असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात होता. मागील वेळेस उंबरठा उत्पादनाच्या निकषात विमाधारक परताव्यांसाठी पात्र ठरले नाहीत.

खानदेशात कापूस पिकासाठी सर्वाधिक विमा संरक्षण घेणारे शेतकरी आहेत. त्यापाठोपाठ सोयाबीन पिकासंबंधी विमा संरक्षण घेतले जाते. कापसाची खानदेशात सर्वाधिक आठ लाख हेक्टरवर लागवड केली जाते. परंतु या सर्व क्षेत्रासाठी विमा संरक्षण यंदा घेण्यात आले नसल्याची स्थिती आहे.

# मराठा मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या; खा.सोनवणे भेटले गडकरींना

## मराठा समाजाच्या मोर्चासाठी नितीन गडकरी यांना दिले पत्र

बीड। प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई मोर्चा निमित्त बीड जिल्ह्यासह राज्यभरातून मुंबईकडे लाखो वाहने येणार आहेत. या वाहनांमधून युवक, शेतकरी, कष्टकरी येणार असून त्यांच्यावर आर्थीक भार पडू नये, यासाठी त्यांच्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवूनही मागणी केली आहे.

मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी बीडसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने नागरिक मुंबईकडे प्रवास करणार आहेत.या प्रवासासाठी हजारो वाहने मुंबईकडे येणार असून त्यामुळे मार्गावरील टोल नाक्यांवर मोठी गर्दी होणार आहे तसेच



प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार येणार आहे. शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिक स्वयंस्फूर्तपणे या आंदोलनात सहभागी होत असल्यामुळे त्यांच्यावर जादा खर्च पडू नये, यासाठी त्या कालावधीत मुंबईकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल व

### समाजासाठी पत्र देणारे पहिले लोकप्रतिनिधी

राज्यात मराठा आरक्षण प्रश्नी वातावरण तापलेले आहे.दि.२९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन होत आहे. यासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या गरीब मराठा समाजावर आर्थीक भार पडू नये, यासाठी टोलमाफीचे पहिले पत्र केंद्रीय मंत्री तसेच व यांना दिले आहे. असे पत्र देणारे खा.बजरंग सोनवणे हे पहिले लोकप्रतिनिधी आहेत.

वाहतूक व्यवस्थापन सुलभ होईल म्हणून या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे म्हटले आहे. मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची देखील भेट घेतली. यावेळी मराठा समाजाच्या मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफीचा निर्णय घेण्यात यावा, तसे आदेश आपण द्यावेत, अशी मागणीही केली. यावेळी दोघात टोलमाफिच्या विषयावर सकारात्मक चर्चा झाली आहे.

# लिंबागणेश परीसरात मुग काढणीला वेग; पाऊस,मजुरी टंचाई शेतकऱ्यांना तिहेरी पेच



लिंबागणेश। प्रतिनिधी

मृग नक्षत्रात पेरणी झाल्यानंतर उत्पादनाची हमी असल्याने यंदा मुग-उडीद या पिकांचे क्षेत्र लक्षणीय वाढले आहे. सोयाबीनला पर्याय म्हणून शेतकऱ्यांनी मुगाला प्राधान्य दिले असून प्रारंभीच्या सततच्या पावसामुळे पिकांची वाढ समाधानकारक झाली. परंतु ऐन काढणीच्या वेळी झालेल्या भीज पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. सध्या लिंबागणेश शिवारात मुग काढणीला वेग आला आहे. मात्र गेल्या आठवड्यातील रिमझिम पावसामुळे मजुरांचे काम खंडित होत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. भिज पावसाने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना आता मजुरांच्या टंचाईचा व अधिक मजुरीच्या मागणीचा सामना करावा लागत आहे.

लिंबागणेशचे शेतकरी बालासाहेब जाधव यांनी सांगितले की, ''मुग काढणीसाठी मोठ्या प्रमाणावर मजुरांची गरज असते. हिश्शेवारी पद्धतीने २ हिस्सा शेतमालकाला व १ हिस्सा मजुरांना असा व्यवहार होतो. पण मजुरांना आणणे-नेणे याचा खर्च शेतकऱ्यालाच करावा लागतो. त्यातच काढणीस विलंब झाल्याने शेंगा फुटणे, मुग पांढरा पडणे व कर येणे यामुळे पिकांचे नुकसान होत आहे. मजुरांची कमतरता आणि त्यांच्या वाहतुकीवरील खर्चामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक भुर्दंड पडत असून मुग काढणीच्या हंगामात शेतकरी हतबल झाल्याचे चित्र सध्या लिंबागणेश परिसरात पाहायला मिळत आहे.

# मिल्लिया प्राथमिक उर्दू शाळा मुलींची (भालदारपुरा) ने राबविला अभिनव उपक्रम

बीड। प्रतिनिधी

शहरातील भालदार पुरा येथे असलेल्या मिल्लिया मुलींची उर्दू प्राथमिक शाळेत एक पेड माँ के नाम हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी समंदर खान, केंद्र प्रमुख मनियार हकीम यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या आईंसोबत प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. शासनाच्या एक पेड माँ के नाम अंतर्गत विद्यार्थ्यांनी त्यांच्या आईंसोबत मिळून आपल्या परिसरात, शाळेत झाडे लावली. त्याचे फोटो लिंक मध्ये अपलोड करत वृक्षारोपण मध्ये सक्रिय सहभाग घेतला. नंतर याची ऑनलाईन प्रमाणपत्र प्राप्त झाली. त्या प्रमाणपत्राच्या वाटपाचा कार्यक्रम शाळेत घेण्यात आला. यावेळी शाळेतही वृक्षारोपण करण्यात आले. हा उपक्रम राबविल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी समंदर खान पठाण आणि केंद्रप्रमुख हकीम मणियार यांनी शाळेचे कौतुक केले.



शासनाचा एक पेड माँ के नाम हा उपक्रम संस्थेच्या सचिव खान सबिहा बेगम यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका मिर्झा कनिज़ फातेमा आणि पर्यवेक्षिका रिज़वाना बेगम कादरी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे ज्ञानवर्धक व उत्कृष्ट सूत्रसंचालन नजमुसहेर बाजी, मसरत सुलताना बाजी आणि सबीया खतीब बाजी या सहशिक्षिकांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हाजरा बाजी, फैसल सर, शाज़ीया बाजी, निशात बाजी, सना बाजी, अरशीया बाजी, तसलीम बाजी, सबा फातेमा बाजी, सबा अंजुम बाजी यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मजुर कामगार सहकारी संस्थेच्या निवडणुकीत आठ उमेदवार बिनविरोध

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हा मजुर कामगार सहकारी संस्थेच्या २०२५-२०२९-२०३० या कालावधीसाठीच्या निवडणुकीत एकूण आठ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या निवडून आलेल्या उमेदवारांचा सत्कार काँग्रेस नेते विनोद यादव यांच्या हस्ते करण्यात आला. निवडून आलेल्या सदस्यांना पेढे देऊन व पुष्पहार अर्पण करून त्यांचा गौरव करण्यात आला. जिल्ह्यातील सुमारे तीनशे मजुर सहकारी संस्था दरवर्षी बांधकाम विभाग, पाटबंधारे, जिल्हा परिषद, नगर परिषद आणि इतर शासकीय विभागांची कोट्यवधी रुपयांची कामे पार पाडतात. त्यामुळे या संस्थेच्या निवडणुकीकडे जिल्ह्यातील कामगार आणि बांधकाम क्षेत्राशी संबंधित घटकांचे विशेष लक्ष लागले होते.

बिनविरोध निवडलेले उमेदवार असे : जालना शहर मतदारसंघातून अभयकुमार धन्नाबाई बलीराम व रविंद्र चंदकांत जगदाळे, जालना ग्रामीणमधून दादाराव माणीकराव पाचफुले, जाफराबादमधून वसंतराव शेषराव ढवळे, परतूरमधून सय्यद अकबर सय्यद



अजीम, मंठा मतदारसंघातून रमेश रामराव कुलकर्णी, अंबडमधून संभाजी भास्कर वाकडे तर धनसांवगीतून नानासाहेब अप्पासाहेब उगले. या कार्यक्रमाला महेंद्र रत्नपारखी, सतीश देशमुख, किरण किल्लेदार, नटवर किल्लेदार, नाना बारगाजे, बाबासाहेब वानखेडे, राजु पाटील, राजेंद्र गोरे, सुरेश रत्नपारखी, प्रभु सांगोळे, वंश यादव, अंश यादव आणि सारांश यादव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, बदनापूर (१), भोकरदन (१), अनुसूचित जाती-जमाती (१), विमुक्त जाती-भटक्या जमाती (१), इतर मागासवर्गीय (१) आणि महिला राखीव (२) या मतदारसंघांतील निवडणुका ३० ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार आहेत. याच दिवशी निवडणुकीचा निकालही जाहीर होणार आहे. या निवडणुकीचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी उमेशचंद्र हुशे आणि सहाय्यक महेश जयरंगे जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडले जाणार आहे.

# सुधाकरराव काळम यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भाजपच्या तालुका उपाध्यक्ष रंजनाताई काळम यांचे पती सुधाकरराव काळम यांच्या दुःखद निधनाबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी लंडन वरून फोन करुन काळम परिवाराचे सांत्वन करत त्यांना धीर दिला.

भाजपच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यां तथा तालुका उपाध्यक्ष रंजनाताई काळम यांचे पती सुधाकरराव हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते, आजारपणातच त्यांचे आज सायंकाळी दुःखद निधन झाले. अतिशय मनमिळावू असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

ना. पंकजाताई मुंडे यांना त्यांच्या निधनाची बातमी कळताच त्यांनी तातडीने लंडन येथून रंजनाताईंना मोबाईल वरून संपर्क साधला आणि त्यांचे सांत्वन केले तसेच धीरही दिला. नेता कितीही दूर अंतरावर असला तरी आपल्या कार्यकर्त्यांची काळजी व त्यांच्या कुटुंबियां विषयी असलेली तळमळ हेच ना.पंकजाताईंच्या कृतीतून सिध्द होते.

# बीड येथे बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

बीड। प्रतिनिधी

आदिवासी क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त बीड येथे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. या चर्चासत्रासाठी जिल्ह्यातील अनुसूचित जमातीतील पारधी, भिल्ल, कोळी महादेव, ठाकर, ठाकूर, राजगौड आदी जमातीतील बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कोळी महादेव समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष संभाजी गायकवाड यांनी केले आहे सदरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात आदिवासी समाजाचे योगदान व भूमिका या विषयावर दिनांक २४ व २५ ऑगस्ट २०२५ रोजी चर्चासत्र होणार आहे या चर्चासत्रात भारतासह विदेशातील इतिहासकार, संशोधक, शिक्षणतज्ञ, विचारवंत यांचे मार्गदर्शन होणार आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आदिवासी विकासमंत्री डॉ.अशोक उईके, व अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आदिवासी राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजीमंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच चर्चासत्रात आदिवासी नायकांच्या नेतृत्वातील स्वातंत्र्य लढ्यावर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच आदिवासी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत आदिवासी कला, संगीत व परंपरेचे सादरीकरण होणार आहे. उपरोक्त कार्यक्रम हा आदिवासी समाजासाठी एक पर्वणीच म्हणल्या जाणार आहे. तरी सर्व समाजबांधवांनी, महिला भगिनींनी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष संभाजी गायकवाड, सचिव सुनिल बळवंते, मधुकर घाणे, विष्णु तवरे, अंकुश मेढे, मुकूंद भुतपल्ले, शिवाजीराव कांबळे, बबन नागलबोने, नितीन कोळी, ऋषिकेश तवरे, संदिपान कदम, गणेश सोळंके, राजकुमार कांबळे, संदिपान कदम, वैभव होळकर, रामभाऊ वाघमारे, नंदुभाऊ बळवंत, अशोक सोनवणे, नागनाथ बळवंत, दत्ता माने, प्रकाश माने, संजय मोरे, वाल्मीक गायकवाड, रावसाहेब तवरे, ताराचंद कवरे आदींनी आवाहन केले आहे.

# आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त एड्स जनजागृती व्याख्यान

नेकनूर। प्रतिनिधी

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त एड्स जनजागृती व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानाचे प्रमुख पाहुणे म्हणून गोरे मॅडम उपस्थित होत्या तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक इनकर व्ही.एस. यांनी केले त्यांनी प्रास्ताविकेमध्ये विद्यार्थ्यांना एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी अशा व्याख्यानमालेची गरज आहे व त्यामधून विद्यार्थ्यांनी आरोग्य संबंधी जागृत होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गोरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना एड्स विषयी आपण जागृत राहिले पाहिजे व बाल वयातून प्रोढ वयामध्ये आपण पदार्पण करत असताना शरीरामध्ये होणारे बदल जाणून



घेतले पाहिजे व मुला मुलींनी याविषयी काळजीपूर्वक माहिती जाणून घेतले पाहिजे तसेच युवा पिढीने एड्स विषयी संरक्षण करण्यासाठी सुरक्षितता बाळगणे गरजेचे आहे तसेच जर तो आजार झाला असेल तर लपवून न ठेवता आपण जिल्हा आरोग्य केंद्राशी संपर्क केला पाहिजे व त्यावर उपचार घेतला पाहिजे समाजामध्ये अशा व्यक्तीला दूर न करता त्याला सन्मानाने वागणूक दिली पाहिजे असे आपले मत व्यक्त केले अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. डी. के. ढास यांनी विद्यार्थ्यांनी एड्स विषयी माहिती घेणे गरजेचे आहे.

व सुरक्षितता बाळगणे गरजेचे आहे तसेच एड्स चे संरक्षण करण्यासाठी सुरक्षित बाळगणे गरजेचे आहे. असे आपले मत व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आणि आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक रामरुले डी.के. यांनी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, आष्टी जि. बीड**

**(दंड-विभाग)**

**दूरध्वनी - (०२४४१)२८२५४२**

**क्र.२०२५/दंड/जन्म-मृत्यूनोंदणी/कावि-**

**दिनांक. ०२/०८/२०२५**

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे आष्टी ता. आष्टी. यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार श्री. बेग मिर्झा रहमतुल्लाह मिर्झा रउफ बेग रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांची मुलगी नामे मिर्झा हाजरा रहमतुल्लाह बेग जन्म दि. ३०/०८/२०२१ रोजी मौजे आष्टी येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१/०८/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तहसीलदार आष्टी**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, आष्टी जि. बीड**

**(दंड-विभाग)**

**दूरध्वन्नी - (०२४४१)२८२५४२**

**क्र.२०२५/दंड/जन्म-मृत्यूनोंदणी/कावि-**

**दिनांक. ०२/०८/२०२५**

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे आष्टी ता. आष्टी. यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार श्री. बेग मिर्झा रहमतुल्लाह मिर्झा रउफ बेग रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांची मुलगा नामे मिर्झा जुलरखरनैन रहमतुल्लाह बेग जन्म दि. १४/०९/२०२४ रोजी मौजे आष्टी येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१/०८/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तहसीलदार आष्टी**

# एफआरएस व लाडक्या बहिणीच्या फेर सर्वेक्षणावरून अंगणवाडी ताईंनी बजावला इशारा

## ९ सप्टेंबरला महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मतनिस महासंघाचा मुंबईत भव्य मोर्चा

बीड। प्रतिनिधी

अंगणवाडी सेविका व मदतनिस यांच्यावर सरकारकडून टाकण्यात येणाऱ्या वाढत्या कामाच्या ताणाविरोधात महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनिस महासंघाने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. एफआरएस, पोषण ट्रॅकर ॲप, प्रधानमंत्री मातृवंदना योजना व 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे फेरसर्वेक्षण यांसारखी जबाबदारी अंगणवाडी ताईंवर लादू नये, अशी ठाम मागणी करत येत्या ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख , प्रदेश उपाध्यक्ष कमल बांगर, राज्य संघटक दत्ता देशमुख, बीड जिल्हा संघटक सचिन अंधळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अंगणवाडी सेविकांना मुळ काम सोडून इतर कामात गुंतवले जात असल्यामुळे मुलांचे पूर्वशालेय शिक्षण व पोषण सुधारणा या मुख्य उद्दिष्टावर विपरित परिणाम होत आहे.

सध्या एफआरएस आणि पोषण ट्रॅकर ॲपच्या माध्यमातून काम दिले आहे. दोन महिन्यांचा टीएचआर एकदाच वाटप करावा लागतो, मात्र दर महिन्याला टीएचआर वाटल्याचा फोटो अपलोड करणे बंधनकारक आहे.

निकृष्ट दर्जाचा टीएचआर लाभार्थ्यांना मिळत असून, फोटो अपलोड करतानाही मोठ्या अडचणी येतात. सेविकांकडे ४ जी मोबाईल असून सरकारचे ॲप ५जीवर चालते. त्यामुळे सरकारने सेविकांना ५जी मोबाईल द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत पात्र-अपात्र तपासणीचे काम अंगणवाडी सेविकांकडे दिले आहे. मात्र गावातच एखादी लाभार्थी अपात्र ठरवावी लागल्यास त्यातून थेट अंगणवाडी ताईंवर हाणामारी, वादविवाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हे काम अंगणवाडी ताईंवर सोपवू नये, असा इशारा महासंघाने दिला आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये तत्कालीन राज्य सरकारने सेविकांना ५ हजार आणि मदतनिसांना ३ हजार रुपयांची मानधनवाढ जाहीर केली होती.

मात्र आजपर्यंत ती पूर्णपणे लागू झालेली नाही, असा आरोपही संघटनेकडून करण्यात आला. एफआरएस, पोषण ट्रॅकर, पीएमएमव्हीवाय (प्रधानमंत्री मातृ वंदना योजना) या कामांचा प्रचंड ताण अंगणवाडी सेविकांवर आला आहे. त्यामुळे मुळ अंगणवाडीचे काम मागे पडले असून लाभार्थींची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. या पार्श्वभूमीवर पीएमएमव्हीवाय योजनेच्या कामावर अंगणवाडी सेविकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. ९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मुंबईतील मोर्चात राज्यभरातून हजारो अंगणवाडी सेविका-मदतनिस सहभागी होणार आहेत. सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत तर निदर्शने आणखी तीव्र करण्याचा इशारा महासंघाने दिला आहे. प्रधानमंत्री मातृवंदना योजना अंमलबजावणीस नकार देणाऱ्या अंगणवाडी सेविका विरूध्द प्रशासकीय कार्यवाही करावे असे पत्र जिल्हा कार्यकम अधिकारी जिल्हा परिषद बीडचे मनोज ससे यांनी सर्व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना काढले होते. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भगवानराव देशमुख व जिल्हा कार्यक्रमाधिकारी यांची दूरध्वनी द्वारे चर्चा झाल्यानंतर जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांनी कारवाई करणार नाही असे ठोस आश्वासन दिले. सूचना सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

राज्य लोकतंत्र

शनिवार, दि.२३ ऑगस्ट २०२५ | ६

# महसूल सप्ताहात बीड तालुक्यातील १४,२४५ लाभार्थ्यांना दिलासा

## ऑनलाइन हयात प्रमाणपत्राची सुविधा उपलब्ध

बीड । प्रतिनिधी

महसूल सप्ताह २०२५ च्या निमित्ताने बीड तालुक्यात गरजू नागरिकांसाठी मोठा दिलासा देण्यात आला आहे . संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ सेवा योजनेंतर्गत एकूण १४,२४५ लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट अनुदान जमा करण्यात आले . राज्य शासनाच्या आदेशानुसार १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात महसूल सप्ताह साजरा करण्यात आला असून , बीड तालुक्यात तहसील कार्यालयाच्या वतीने विविध उपक्रम राबवून या सप्ताहाचे प्रभावी आयोजन करण्यात आले . या उपक्रमामध्ये उपविभागीय अधिकारी श्रीमती कविता जाधव यांच्या आदेशानुसार आणि तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल अधिकारी , नायब तहसीलदार तसेच सहायक अधिकारी यांनी विविध गावे व भागांमध्ये जाऊन थेट नागरिकांशी संवाद साधला विशेष म्हणजे ५ ऑगस्ट रोजी नायब तहसीलदार अण्णा वंजारे यांच्या उपस्थितीत तेलगाव नाका व आशा टॉकीज परिसरात घरोघरी भेट देऊन डी बी टी प्रणालीद्वारे थेट २७ लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्यात आले . महसूल विभागामार्फत २०२४२५ या कालावधीत संजय गांधी व श्रावणबाळ योजना समित्यांच्या १२ बैठकांमधून एकूण २३२० प्रकरणांना मंजुरी देण्यात आली. यात संजय गांधी योजनेअंतर्गत १०४ ते २३० प्रकरणे तर श्रावणबाळ योजनेत १३२ ते ३१५ प्रकरणांना मंजुरी मिळाली. अंतर्गत संजय गांधी योजनेतील ७,५६१ लाभार्थी पात्र ठरले असून त्यातील ६,६९२ जणांना थेट मदत मिळाली. श्रावणबाळ योजनेत ८,५११ पात्र लाभार्थ्यांपैकी ७,५५३ जणांना थेट अनुदान जमा झाले. अशा प्रकारे एकूण १४,२४५ लाभार्थ्यांना घरबसल्या मदतीचा लाभ मिळाला असून हे यश ८८% इतके आहे. याशिवाय कुटुंबातील कमावणारा व्यक्ती मृत झालेल्या ६० लाभार्थ्यांनाही विशेष प्राधान्याने अनुदान मंजूर करण्यात आले . पात्रतेत वय , उत्पन्न मर्यादा , सामाजिक परिस्थिती यांचा विचार करण्यात आला असून आधार कार्ड , उत्पन्नाचा दाखला , रहिवासी दाखला , बँक




पासबुक यासारखी आवश्यक कागदपत्रे सादर करून मदतीचा लाभ घेता येतो . दरम्यान , लाभार्थ्यांसाठी हयात प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया आता अधिक सोपी करण्यात आली आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की, आधार फेस आयडी ॲप व बेनिफिशियरी सत्यापन ॲप वापरून घरबसल्या काही मिनिटांत डिजिटल जीवन हयात प्रमाणपत्र मिळवता येईल . या ॲपच्या साहाय्याने इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ सेवा निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा सेवा निवृत्ती योजना , तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग सेवा निवृत्ती योजना यांसारख्या योजनांचा लाभ सुरु ठेवता येणार आहे . केंद्र शासनाने बेनिफिशरी सत्यापन ॲप विकसित केले असून या ॲपच्या मदतीने लाभार्थ्यांचे हयात दाखले ( डिजिटल लाईफ सर्टिफिकेट ) थेट एन एस ऐ पी पोर्टलवर अपडेट होतील . त्यासाठी लाभार्थ्यांनी आपल्या मोबाईलमध्ये गुगल प्ले स्टोर वरून प्रथम आधार फेस आर डी ॲप डाउनलोड करावे , त्यानंतर बेनिफिशरी सत्यापन ॲप डाउनलोड करावे . या ॲपच्या सहाय्याने आधार क्रमांक टाकून चेहरा स्कॅन केल्यावर सुरक्षित सत्यापन होईल आणि हयात प्रमाणपत्र थेट विभागाकडे पाठवले जाईल . महत्त्वाचे म्हणजे , जर लाभार्थ्यांनी वेळेत हयात प्रमाणपत्र सादर केले नाही , तर त्यांच्या सेवा निवृत्ती अनुदानाच्या रकमेच्या वितरणात अडचण निर्माण होऊ शकते . त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी वरीलप्रमाणे ॲप वापरून त्वरित आपले हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे . या डिजिटल प्रक्रियेमुळे ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांना रांगेत उभे राहण्याची गरज भासणार नाही . ही प्रणाली सुरक्षित , पारदर्शक असून लाभार्थ्यांचा वेळ , पैसा आणि त्रास वाचणार आहे . या उपक्रमासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब

# धानोरा रोडवरील रेल्वे पुलाखाली साचले पाणी

## वाहतूक ठप्प ; संतप्त ग्रामस्थांचे आंदोलन, खासदार बजरंग सोनवणे यांच्या मध्यस्थीनंतर व जिल्हा प्रशासनाच्या उपस्थितीत आंदोलन मागे

बीड । प्रतिनिधी

शहरातील धानोरा रोडवरील रेल्वे पुलाखाली पावसाचे पाणी साचल्याने ये-जा करणाऱ्या शेकडो ग्रामस्थांच्या वाहतुकीला मोठा फटका बसला. अडथळा दूर करण्याऐवजी रेल्वे प्रशासनाने पुलावरून जाणाऱ्या मार्गावर मुरूम काढण्याचे काम सुरू केल्याने पर्यायी मार्गही बंद झाला. यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी





शुक्रवारी दुपारी पुलाजवळ ठिय्या देत तीव्र आंदोलन छेडले.

आहेर धानोरा, वरवटी, मांडवजाळी, लिंबागणेश या गावांना बीड शहराशी जोडणारा मुख्य मार्ग असलेल्या धानोरा रोड परिसरात रेल्वे स्थानक उभारण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसामुळे रेल्वे पुलाखालील खोलगट भाग असलेला रस्ता पूर्णतः पाण्याखाली

# महिला स्वच्छतागृहांचा प्रश्न मार्गी

## स्वच्छता राखण्याचे नागरिकांना आवाहन : मुख्याधिकारी

परळी । प्रतिनिधी

महिलांसाठी स्वच्छतागृह असावेत या मागणीला घेऊन जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी दिलेल्या आदेशानुसार जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यात सद्या शहारत महिला स्वच्छतागराची कामे प्रगतीपथावर असल्या ची माहिती समाजवादी पार्टी महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्षा सालेहा जीलानी शेख यांनी दिली. सालेहा जिलानी शेख यांनी आज परळी न.प. मध्ये येऊन जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार महिलांसाठी विशेष स्वच्छतागृह चे काम पाहून समाधान व्यक्त केले.

बुधवारी (दि.२०) न.प. मध्ये मा.मुख्याधिकारी त्रिंबकजी कांबळे यांची भेट घेऊन नंतर नगररचना विभागातील ज्ञानेश्वर ढवळे यांच्याकडून शहरात होत असणाऱ्या एकूण शौचालयाची माहिति घेतली.

**शहरात सद्यस्थितीत वापरात असलेली आणि नवीन सुरू होणारी शौचालय लवकरात सुरू होतील या साठी आम्ही प्रयत्नशील आहोत. ही शौचालय वापरताना ती स्वच्छ राहतील याची काळजी नागरिकांनी घ्यायला हवी.**

**-त्रिंबक कांबळे**
**मुख्याधिकारी न.प. परळी वैजनाथ**

परळी शहरांमध्ये दोन योजना मधून ९ स्वच्छतागृह (शौचालय) उभारणीस मंजुरी मिळालेली आहे यातील बहुतेक स्वच्छतागृहाची कामे येत्या महिन्याभरात पूर्ण होतील. जिल्ह्यातील जुनी आणि नवीन सर्व शौचालय, स्वच्छतागृहे लवकरच सुरू होतील. कामानिमित्त घरा बाहेर पडणाऱ्या महिलांना व जिल्ह्यात अनेक महत्त्वपूर्ण धार्मिक स्थळे ,पर्यटन स्थळे आहेत तेव्हा जिल्हा बाहेरून येणाऱ्या महिलांची खूप मोठी संख्या आहे. जिल्ह्यात बाहेरून येणाऱ्या सर्व मैत्रिणी, भगिनी, यांना मोठा दिलासा मिळेल अस मला वाटतं.जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ आदेश काढले नाहीत तर सुलभ शौचालयाच्या संदर्भात केलेल्या कामाचा अहवाल सुध्दा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावा असेही आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे एकूणच बीड जिल्ह्यातील महिलांना भेडसावणरा हा प्रश्न मार्गी लागल्याने आम्ही जिल्ह्यातील महिला समाधानी आहोत असेही त्या म्हणाल्या.

# अतिवृष्टीची भरपाई, कर्जमाफीसाठी रस्ता रोको आंदोलनात सहभागी व्हा -ॲड.नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात गेल्या आठ दिवसापासून सतत धार पावसाने व अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्याच्या शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून तूर, कापूस, उडीद, मूग, बाजरी आदि पिके पावसामुळे उध्वस्त झाली आहेत तर अनेक पिके पावसाने वाहून गेली असून शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे त्यामुळे कर्जाच्या संकटात सापडलेला शेतकरी हतबल झाला असून संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या शेतीच्या नुकसानीची सरसकट एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी तसेच पिक विम्यातील जाचक अटी रद्द करुण २०२५ चा सालाचा सरसकट १००% पीक विमा लागू करण्यात यावा, शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज



माफ करण्यात यावे,गत वर्षीचा १००% पिक विमा सरसकट वाटप करण्यात यावा, माजलगाव तालुक्यातील तलाठी, मंडळाधिकारी यांनी सज्जावर वास्तव्यास राहुन तलाठी, मंडळाधिकारी कार्यालयातच नियमित कामकाज केले पाहिजे या मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी गंगामसला येथे सकाळी १०:०० वाजता रस्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे तरी यामध्ये हजारो शेतकरी बांधवांनी सहभागी होऊन शेतकऱ्याच्या मागण्या मान्य करून घ्याव्यात असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड नारायण गोले पाटील, भाई राहुल सोळंके, भाई अशोक कुलकर्णी, भाई सतीश शेजुळ, भाई चांगदेव शेजुळ, भाई लहू शेजुळ आदिंनी केले आहे.

# पोळा सण उत्साहात साजरा



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

या वर्षी सुरवाती पासुनच चागला पाऊस पडला आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी पोळा सण उत्सवात साजरा करण्यात आला आहे. शेतकरी हा आपल्या सर्जा राज्य बैलाला वर्ष भर अतिशय जिवापाड जपत असतो शेतात शेतीतील सर्व कामे नांगरणी, वखरणी,कोळपणी, आदी कामे बैलाने करतो, या बैलासाठी, वर्षातील एक सण म्हणजे पोळा या सणाला शेतकरी आपल्या बैलांना धुऊन, त्याचा शिंगणा रंग देतो गावात हनुमान मंदिरात घेऊन जाण्यासाठी बैलाला जुल, भासिंग, फुगे, आदी सजावट करून हनुमान मंदिराला प्रदक्षिणा घातली जाते, या सर्व शेतकऱ्यांनी पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



**आष्टी : शेतकऱ्यांचा व महाराष्ट्रातील महत्त्वाचा सण समजला जाणारा बैलपोळा लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या अद्वोषचंद्र निवासस्थानी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर्जा राजाचे पुजन करताना प्राजक्ताताई धस युवा नेते सागर आप्पा, धाकटी कन्या मैथिली माऊ, उप नगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, नगरसेवक सुरेश वारुंगळे, शरीफ शेख, बाबु कदम व ईतर**

# पारंपारिक पध्दतीने बैलपोळ्याची मिरवणूक उत्साहात

## प्रतिवर्षाप्रमाणे शेटे कुटुंबियांना मिळाला पहिला मान

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शहर आणि परिसरात पारंपारिक पद्धतीने दि २२ ऑगस्ट शुक्रवार रोजी बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला.प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी प्रथम बैलं मिरविणाचा पहीला मान शेटे कुटुंबियांना मिळाला आहे.**

दरवर्षी पिठोरी अमावस्येच्या दिवशी बैलांचा सण पोळा उत्साहात साजरा करण्यात योतो,याही वर्षी दि २२ ऑगस्ट




शुक्रवार रोजी माजलगाव शहरात मानाच्या शेटे कुटुंबीयांच्या बैलांची प्रथम मिरवणुकीनंतर शहरात पोळ्यास प्रारंभ झाला.

माजलगाव शहरात शुक्रवारी दुपारी १:०० वाजण्याच्या सुमारास झेंडा चौक भागातील मानाचे शेतकरी विश्वनाथ विठ्ठलअप्पा शेटे यांच्या बैलांची प्रथम मिरवणूक काढली.शेटे यांच्या बैलांची विधिवत पूजा करण्यात आली.बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दिल्यानंतर त्यांची ढोल-ताशांच्या गजरात वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. झेंडा चौकातून मस्जिद चौक, हनुमान चौक मार्गे ही मिरवणूक निघाली.चौकातील हनुमान मंदिरात दर्शन घेऊन मिरवणुकीच्या सांगता झाली. याप्रसंगी

# पद्मश्री डॉ. लहाने करणार संपादक गावरस्करांचा सन्मान, सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे सुपुत्र ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर अण्णा यांना मराठी पत्रकार परिषदेचा नागोजीराव दुधगावकर स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जालना रोडवरील हॉटेल अन्वीता येथे पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळ्याची गावरस्कर प्रेमी आणि मराठी पत्रकार परिषद









पदाधिकाऱ्याकडून जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे या सत्कार सोहळ्याला जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्यासह सर्व सन्माननीय संपादक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे माजी विभागीय सचिव दिलीप खिस्ती, विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी

# आमचा देवाभाऊ अभियानातून माजलगाव तालुक्यातील लाडक्या बहिणींच्या २,८५५ राख्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्त

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात 'आमचा देवाभाऊ' विशेष अभियान उत्साहात राबविण्यात आले.ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या अभियानात तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपले प्रेम व आपुलकी व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी अनेक महिलांनी पत्राद्वारे देखील देवा भाऊचे लाडक्या बहिणीला



असलेले सहकार्य याबद्दल देवा भाऊ विषयी कृतज्ञता व्यक्त केली. खरोखरच महाराष्ट्र राज्यासाठी व महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सुरक्षिततेसाठी सन्मानासाठी व आमच्या लाडक्या बहिणीसाठी विविध योजना देत आहेत , त्यामुळे आमचे देवा भाऊ आमच्या सर्व भगिनींसाठी एक आदर्श भाऊ आहेत अशी प्रतिक्रिया तुलसा कुलकर्णी सह विविध भगिनीं यांनी पत्राद्वारे दिली.या उपक्रमांतर्गत लाडक्या बहिणींनीकडून तब्बल २८५५ राख्या संकलीत करण्यात आल्या. संकलीत राख्या बीड येथील भाजपा कार्यालयात झालेल्या विशेष कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या मार्फत माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या प्रसंगी भाजपा युवा नेते अक्षय मुंदडा सह जिल्ह्यातून आलेल्या मंडळ अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या अभियानासाठी कीट्टी आडगाव मंडळ माजलगाव तालुका अध्यक्षा सौ.रूपाली कचरे, माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी,पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय परिश्रम घेतले.राख्या संकलन मोहिमेत श्वेता ठोसर,अनिता लोखंडे,अमृताताई, गौरीताई देशमुख, पूजा मुंडकर या बहिणींसह गणेश सातपुते,सिद्धेश्वर राठोड,कल्याण शेप,सुधाकर रासवे, मनोज कोरडे,सचिन तौर,संजय पवार, दीपक गरड, मल्हारी ढगे आदींनी विशेष योगदान दिले.हा कार्यक्रम एक वेगळा,स्तुत्य स्नेहसोहळा ठरला. या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरील बहिणींचे अपार प्रेम आणि महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास पुन्हा अधोरेखित झाला.

# युसूफवडगाव येथे बैलपोळा सण उत्साहात साजरा

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील शेतकऱ्यानी अतिशय उत्साहात आपल्या सर्जा राजाला सजवुन गाजतवाजत मिरवत बैलपोळा सण उत्साहात साजरा केला.पण गेल्या काही वर्षापासुन शेतकऱ्यांनाकडे पशुधनात लक्षणीय कमतरता दिसुन आली.**

शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावुन बैल काळ्या आईची सेवा मशागत करतो त्यांच्या प्रत्येक सुख दुःखात सदैव सोबत असतो अशा बैलांचा सण म्हणजेच बैलपोळा आदल्या शेतकरी ज्या खांद्यावर जोत ठेवुन



काळ्या आईची मशागत करतो त्या खांद्यांवर तुप हळद लावुन खांदा मळणी करतो तर दुसऱ्या दिवशी म्हणजेच बैलपोळ्या दिवशी त्याला अंघोळ घालुन आकर्षक झुल चढवुन शिंगाणा रंगवुन त्याच्या वाजतगाजत मिरवणुक काढुन त्यांची विधिवत पुजा करून त्याला पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घेऊन त्याच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करूनच मग तो आपला उपवास सोडतो.या वर्षी वरूणराजाने भरभरून आशीर्वाद दिल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण होते.त्यामुळे बैलपोळा सण


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात केरळचा पद्मनाभ दरबार; श्रीमंत दगडूशेठची सजावट दर्शनास सज्ज

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३३ व्या वर्षी गणेशोत्सवात केरळमधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. गणेश चतुर्थीला बुधवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी मध्यप्रदेश चित्रकुट येथील अनंत विभूषित जगद्गुरु रामानुजाचार्य झालरिया पीठाधीश्वर स्वामी घनश्यामाचार्य महाराज यांच्या हस्ते श्रीं ची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. तर, मंदिरावरील विद्युतरोषणाईचे उद्घाटन सायंकाळी ७ वाजता होईल, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी पत्रकार परिषदेत दिली.




पत्रकार परिषदेला ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतीश रासने, सौरभ रायकर, तुषार रायकर, मंगेश सूर्यवंशी, अमोल चव्हाण, विनायक रासने यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बुधवारी (दि.२७) प्राणप्रतिष्ठापनेपूर्वी सकाळी ८.३० वाजता मुख्य मंदिरापासून फुलांनी सजविलेल्या रथातून श्रीं ची आगमन मिरवणूक काढण्यात येणार आहे. विविध प्रकारच्या आकर्षक फुलांनी रथ सजविण्यात येणार आहे. प्रतिष्ठापनेनंतर उत्सवमंडपात दुपारी १२ पासून भाविकांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घ्यावा. तर, सायंकाळी विद्युत रोषणाई व सजावटीचे उद्घाटन होणार आहे.

भारतातील केरळ राज्याची राजधानी असलेल्या तिरुअनंतपुरम येथे भगवान विष्णूंना समर्पित असे एक हिंदू मंदिर म्हणजे पद्मनाभस्वामी मंदिर. हे मंदिर श्री वैष्णव परंपरेत श्री विष्णूंचे पवित्र निवासस्थान मानले जाणारे १०८ दिव्य देसमांपैकी म्हणजेच निवास स्थानांपैकी एक आहे. अत्यंत पवित्र असलेल्या या मंदिराची तेजस्वी प्रतिकृती यंदाच्या गणेशोत्सवात साकारण्यात येत आहे. द्मनाभ स्वामी मंदिराच्या प्रतिकृतीत ५ थरांचा गोपुर असणार आहे. त्यामध्ये कृष्णलीला, रामायण, सप्तऋषी, घोडे, हत्ती, सिंह साकारण्यात येणार आहेत. तर, गाभा-यात विष्णू लक्ष्मी, शिवपार्वती, श्रीकृष्ण आणि नृसिंह यांच्या मूर्ती असतील. मुख्य मखराच्या वरच्या बाजूस अष्टकोनी भागामध्ये भगवान पद्मनाभ स्वामींची भव्य निद्रिस्त मूर्ती साकारण्यात येणार आहे. नानाविध वैशिष्टयांनी परिपूर्ण असलेल्या मंदिराची प्रतिकृती सुमारे १०० फूट इतकी असेल.

प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रंद आणि १०० फूट उंच असणार आहे. यामध्ये ३० भव्य खांब असून ५०० देवी-दैवता, ऋषीमुनी यांच्या मूर्ती असणार आहेत. गाभारा सुवर्ण रंगाने सजलेला असून संपूर्ण छताचा भाग अष्टकोनी स्वरूपात साकारण्यात येईल. मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रीं चे दर्शन घेता येईल. कलादिग्दर्शक विनायक रासकर यांनी मंदिराचे काम, मंडप व्यवस्था काळे मांडववाले यांनी केली आहे.

## पर्यावरण पूरक शाडूच्या गणेश मूर्ती बनवणे स्पर्धेत १४५ मुलांचा सहभाग




**पुणे । प्रतिनिधी**

न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड पुणे या प्रशालेमध्ये गेली ४० वर्ष चालू असलेला हा उपक्रम यावर्षीही विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. शाळेचा माजी विद्यार्थी शिल्पकार रोहन भोसले याने विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दिले.

आणि विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या गणेश मूर्ती साकार केल्या त्यामध्ये शंकराचे रूप धारण केलेला गणेश 'खंडोबाचे रूप धारण केलेला गणेश 'झोपडीतला गणेश,कैलास मधला गणेश, अशी गणपतीची विविध रूप विद्यार्थ्यांनी कल्पकतेने साकारली आहे. शाळा समिती अध्यक्ष अमित कुलकर्णी यांनी या प्रकल्पाचे खूप कौतुक केले नवीन शिक्षण धोरणामध्ये अशाच प्रकारचे शिक्षण अपेक्षित आहे असे ते म्हणाले. या मुर्त्यांचे प्रदर्शन शाळेमध्ये भरवण्यात आले होते. त्याचे उद्घाटन व परीक्षण किरण सरोदे यांनी केले. याप्रसंगी शालाप्रमुख सुनिता राव, जनार्दन नाईक पर्यवेक्षिका डॉ कविता गायकवाड, देविदास झोडगे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या प्रकल्पाचे विभाग प्रमुख हनुमंत तोडकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# हनी ट्रॅपवाल्या प्रफुल्ल लोढाला पिंपरी पोलिसांकडून अटक; ३६ वर्षीय महिलेचे गंभीर आरोप, तपास सुरु

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

हनी ट्रॅप आणि लैंगिक अत्याचार प्रकरणातील प्रफुल्ल लोढाला पिंपरी- चिंचवडच्या बावधन पोलिसांनी अटक केली आहे. बावधन पोलीस ठाण्यात ३६ वर्षीय पीडित महिलेने प्रफुल लोढाविरोधात अत्याचार केल्या प्रकरणी तक्रार दिली होती. या गुन्ह्यातील तपासाठी बावधन पोलिसांनी लोढाला ताब्यात घेतलं आहे. प्रफुल्ल लोढाला बावधन पोलिसांच्या स्वाधीन करण्यात यावं म्हणून कोर्टाला हस्तांतरित वॉरंट मागण्यात आलं होतं. ती मंजुरी मिळताच आज सकाळी ऑर्थर रोड कारागृहातून ताब्यात घेण्यात आलं. काही वेळापूर्वी बावधन पोलिसांनी अटकेची कारवाई पूर्ण केली.




२७ मे २०२५ रोजी पुण्यातील बालेवाडी येथील नामांकित हॉटेलमध्ये महिलेला बोलवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. प्रफुल्ल लोढाने पीडित महिलेच्या पतीला नोकरी लावतो असे आमिष दाखवून हॉटेलवर बोलवून घेऊन अत्याचार केला आहे. याआधी मुंबईमधील अंधेरी एमआयडीसी आणि साकीनाका पोलीस ठाण्यात हनी ट्रॅप आणि अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्या प्रकरणी गुन्हा दाखल आहे. 'हनी ट्रॅप'सह एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर काम देण्याच्या आमिषाने अत्याचार केल्याप्रकरणी मुंबईतील अंधेरी एमआयडीसी आणि साकीनाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असलेल्या प्रफुल्ल लोढा याच्या विरोधात बलात्कारप्रकरणी गुन्हा बावधन पोलिस ठाण्यात दाखल झालेला आहे. त्यानंतर आता पुण्यातील बावधन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर १७ जुलैला लोढाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर लोढा याने पीडित महिलेस पतीला नोकरी लावतो, असे सांगून २७ मे २०२५ रोजी रात्री आठ वाजता बालेवाडी येथील हॉटेलमध्ये बोलावले. पतीला नोकरी लावायची असेल तर त्याबदल्यात शरीरसंबंध ठेवायला दे, असं सांगितलं. त्याला तिने नकार दिला असता तुझीही नोकरी घालवेन, अशी धमकी दिली आणि जबरदस्तीने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. याप्रकरणी पीडित महिलेने १७ जुलै रोजी बावधन पोलिस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील त्यांच्या प्रतिमेस तसेच मोरवाडी चौक येथील पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अभिवादन प्रसंगी उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल



पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते दिपक भोजने, भरत महानवर, सतीश खरात, ड. दत्ता शेंडगे, गणेश एकल, अतुल रकटे, सोनाताई गडदे, रेखाताई दुधभाते, रविंद्र कनखरे तसेच महापालिकेचे कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन...

सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या पुतळ्यास उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी नगरसदस्य संतोष कांबळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत गोफणे, नवनाथ बिडे, अजय दूधभाते, अभिमन्यू गाडेकर, दादासाहेब देवकते,कृष्णाराव गिरगुणे, हरिचंद्र गायके,शरद टेकाळे कल्याणराव बोडके,भालचंद्र मेटी, कृष्णराव बोचडे, बळीराम घोडके, नामदेव मार्कड, काशिनाथ घोडके, मोहन सलगर, महेश भागवत, विमल गाडेकर, छाया गायके, जालिंदर देवकते, लक्ष्मण शिंदे, विलास पाटील, मारुती भालेकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# पुणे महापालिकेच्या वॉर्ड रचनेचा प्रारुप आरखडा जाहीर, ४१ प्रभाग ,१६५ नगरसेवक, हरकती मागवल्या

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीसुरु आहे.आगामी पुणे महापालिका निवडणुकीसाठी महापालिकेकडून वॉर्ड रचनेचा प्रारूप आराखडा जाहीर करण्यात आला आहे. पुण्यात आगामी महापालिका निवडणुकीसाठी एकूण ४१ प्रभाग असणार आहेत. यात ४० प्रभाग चार सदस्यीय असतील तर एक प्रभाग पाच सदस्यीय असेल.




पुणे महानगरपालिका क्षेत्राची एकुण लोकसंख्या २०११च्या जनगणनेनुसार ३४,८१,३५९ इतकी असुन अनुसूचित जातीची लोकसंख्या ४,६८,६३३ इतकी आहे, व अनुसूचित जमातीची लोकसंख्या ४०,६८७ इतकी आहे. तसेच निवडून द्यावयाच्या महानगरपालिका सदस्यांची संख्या १६५ आहे. एकूण ४१ प्रभागांपैकी प्रभाग क्र. ३८ हा ५ सदस्यीय असून उर्वरित ४० प्रभाग ४ सदस्यीय आहेत. प्रारूप प्रभाग रचना संदर्भात नागरिकांच्या हरकती/ सूचना दिनांक २२/०८/२०२५ ते दि. ०३/०९/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत व दि. ०४/०९/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पुणे मनपा भवन स्वागत कक्ष, पुणे मनपाची सर्व क्षेत्रीय कार्यालये व निवडणूक कार्यालय, स्वा.वि.दा. सावरकर भवन या ठिकाणी लेखी स्वरुपात स्वीकारण्यात येतील.

इतर महापालिकांची प्रभागरचना लवकरच

राज्य निवडणूक आयोगाकडून मुंबई महापालिका सह गट अ ब आणि क वर्गातील महापालिकांच्या प्रभाग रचना २५ ऑगस्टला प्रसिद्ध करणार असल्याची माहिती देण्यात आली होती. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे आणि त्यावर हरकती सूचना मागवणे यासाठी देखील वेळ दिला जाणार आहे. मात्र, काही महापालिकांचे प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव हे उशिरा राज्य निवडणूक आयोगाला महापालिकांकडून प्राप्त झाल्याने सोमवारी प्रभाग रचना प्रसिद्ध करणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

# गोळीबार, हातगोळे, अश्रूधुर नळकांड्या फोडण्याचा सराव; पोलिसाचा 'मॉक ड्रिल'



**पिंपरी । प्रतिनिधी**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. याचबरोबर वेगवेगळ्या समाजाचे मोर्चे, आंदोलने आणि मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड पोलिसांनी गुरुवारी (दि. २१) सकाळी सांगवी येथील मोकळ्या मैदानात जमावबंदी हाताळण्याचा सराव (मॉक ड्रिल) केला. या सरावात गोळीबार, हातगोळे फेकणे, अश्रुधुर नळकांड्यांची चाचणी अशा सर्व उपाययोजना प्रत्यक्षात करून पाहण्यात आल्या. हिंसक जमावाला काबू करत जमाव पांगवण्यासाठी पोलिसांकडून नेमके कोणते पाऊल उचलले जाईल, याचे सरावादरम्यान प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. हवेत गोळीबार करून जमाव मागे हटविणे, अश्रुधुर नळकांड्या फोडून परिसर रिकामा करणे, तसेच हातगोळ्यांचा वापर करून जमाव विखुरण्याची प्रक्रिया यावेळी राबविण्यात आली. पोलीस पथकांनी विविध दिशांनी वेगाने तैनात होत जमावबंदी नियंत्रणाचे तंत्र पुन्हा एकदा तपासून पाहिले.

# यंदाही दरवर्षीच्या क्रमाने होणार विसर्जन मिरवणूक'; मुरलीधर मोहोळ यांनी मिटवला विसर्जन मिरवणुकाचा वाद !

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीचा निर्माण झालेला वाद केंद्रीय मंत्री आणि खासदार मुरलीधर मोहोळ यांनी मिटवला असून यंदाही परंपरेनुसार आणि दरवर्षीच्या क्रमाने मिरवणूक काढण्याचा निर्णय सर्व मंडळांकडून एकमताने घेण्यात आला आहे. मोहोळ यांनी यासंदर्भात मानाच्या मंडळांसह सर्व मंडळांची एकत्रित बैठक घेत यावर तोडगा काढला. या बैठकीनंतर मिरवणूक सकाळी साडेनऊ वाजता सुरू करून परंपरेनुसार मंडळाचे क्रम असतील हा निर्णय घेण्यात आला आहे.

यंदाच्या वर्षी काही मंडळांनी नियोजित वेळेआधीच विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर इतर मंडळांनी त्यावर विविध मते व्यक्त केली होती. त्यामुळे नवाच वाद निर्माण झाला होता. त्यावर खासदार मोहोळ आणि आमदार रासणे यांनी सर्व मंडळांची एकत्रित बैठक घेत या विषयावर तोडगा काढला आहे.

याबाबत माहिती देताना मोहोळ म्हणाले, 'पुण्याच्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या परंपरेची चर्चा जगभरात होत असते. देशभरातून हा उत्सव पहायला भाविक मोठ्या संख्येने येत असताना अशावेळी नवे विषय समोर येणे हे पुण्याच्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या हिताचे नव्हते. याबाबत सर्व मंडळांच्या प्रतिनिधींशी चर्चा करत सामोपचाराने आणि एकमताने निर्णय घेण्यास यश आले आहे.

'पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे हा एक परिवार असून प्रत्येकाची मते वेगवेगळी असू शकतात. मात्र हा विषय चर्चेतून सोडवला जाऊ शकतो, यावर माझा विश्वास होता. म्हणूनच सर्वांना एकत्रित येत हा विषय मार्गी लावला आहे. मी हा निर्णय घेण्यासासाठी समजूतीची भूमिका घेणाऱ्या सर्व गणेशोत्सव मंडळांचे स्वागत आणि अभिनंदन करतो.

बैठकीत झालेले निर्णय

- मिरवणूक परंपरेनुसार आणि दरवर्षीच्या क्रमाणेच होणार- मिरवणुकीचा शुभारंभ साडेनऊला करण्यात येणार
- स्थिर वादन कोणतेही मंडळ करणार नाही- मिरवणूक वेळेत संपविण्याची जबाबदारी सर्वच मंडळांवर
- दोन मंडळातील अंतर कमी करण्यासाठी प्रयत्न

# थीम पार्कचे काम वेळेत आणि काटेकोर नियोजनासह पूर्ण करा-अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील

## पिंपळे सौदागार येथील राजमाता जिजाऊ उद्यानातील 'वेस्ट टू वंडर थीम पार्क'ला भेट देत घेतला कामाचा आढावा



**पिंपरी । प्रतिनिधी**

वेस्ट टू वंडर थीम पार्कचे काम पुढील दोन महिन्यांत काटेकोर नियोजनासह पूर्ण करा. उद्यानात उभारण्यात येणाऱ्या ऐतिहासिक वास्तूंच्या प्रत्येक प्रतिकृतीचे काम दर्जेदार करण्यात यावे. हे उद्यान अधिक वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण होण्यासाठी प्रत्येक बाबीचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे, असे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिले.अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानातील 'वेस्ट टू वंडर थीम पार्क'ला भेट देत सुरू असलेल्या सर्व कामांची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी त्यांनी पार्कमधील फूड स्टॉल, नागरिकांसाठी पार्किंगची सुविधा, तिकीट काउंटर, सुशोभीकरणाच्या दृष्टिने वृक्ष लागवड, वास्तूंची सुरक्षितता, सुरक्षा रक्षकांची नेमणूक, कंपाऊंड भिंतीचे काम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रंगरंगोटी तसेच स्थापत्य व विद्युत विभागाशी संबंधित विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला.

विद्युत रोषणाईसह इतर विद्युत विषयक कामे महावितरण विभागाशी समन्वय साधत मार्गी लावा, बांधकाम परवानगी तसेच इतर स्थापत्य विषयक कामे तातडीने पूर्ण करा, असे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले. यावेळी कामातील गॅप ॲनालिसिसची तपासणी करून उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.याप्रसंगी सह शहर अभियंता मनोज सेठीया, माणिक चव्हाण, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, उद्यान अधीक्षक योगेश वाळूज, कार्यकारी अभियंता वि. के. जाधव, सचिन नांगरे यांच्यासह स्थापत्य, विद्युत, उद्यान अशा विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील म्हणाले, 'वेस्ट टू वंडर थीम पार्क हे पिंपरी चिंचवडकरांसाठी एक वेगळे आकर्षण ठरेल. येथे टाकाऊ वस्तूंपासून उभारल्या जाणाऱ्या प्रत्येक वास्तूची गुणवत्ता उच्च दर्जाची असावी. हे उद्यान अधिक वैशिष्ट्यपूर्ण होण्यासाठी प्रत्येक बाब काटेकोर आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावी. या उद्यानातील सर्व सुविधा व्यवस्थित असल्या पाहिजेत. पुढील दोन महिन्यांत या उद्यानाचे सर्व काम वेळेत पूर्ण करण्यात यावे,' असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

टाकाऊ साहित्यापासून उभ्या राहत आहेत ऐतिहासिक वास्तूंच्या प्रतिकृती!

वेस्ट टू वंडर थीम पार्कात जगभरातील १७ जागतिक दर्जाच्या ऐतिहासिक आणि कलात्मक वास्तूंच्या प्रतिकृती टाकाऊ साहित्यापासून उभारल्या जात आहेत. यामध्ये ताजमहल, आयफेल टॉवर, बुर्ज खलिफा, लीनिंग टॉवर ऑफ पिसा, सिडनी ऑपेरा हाऊस, अजंठा लेणी, ला सागराडा फॅमिलीया, चिचेन इत्झा, पिरॅमिड ऑफ गिझा, पेट्रा ऑफ जॉर्डन, कोलोसियम ऑफ रोम, बिग बेन ऑफ लंडन, अंकोर वट ऑफ कंबोडिया, हंपी चारियट, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, ट्रेव्ही फाउंटन आणि माऊंट रश्मोर आदी जगप्रसिद्ध कलाकृती साकारण्यात आल्या आहेत. या प्रतिकृतींमुळे उद्यानाला जागतिक वारशाची झलक मिळणार असून पर्यावरणपूरक पद्धतीने टाकाऊ साहित्याचा अभिनव उपयोग येथे केला जात आहे.

साधु वासवानी उद्यानात केली पाहणी : अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ग प्रभागातील साधु वासवानी उद्यानाला भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी उद्यानाचे सुशोभीकरण करण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. उद्यानातील मोकळ्या जागेत आकर्षक सुशोभिकरण करावे, उद्यानात ठिकठिकाणी सूचना फलक लावण्यात यावेत, दिव्यांगाना प्रवेश सुखकर करण्याच्या दृष्टिने उपाययोजना कराव्यात, पावसामुळे उद्यानात साचणाऱ्या पाण्याची योग्य ती विल्हेवाट लावावी, असे निर्देशही अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी दिले.